| लातूर | वर्ष ३५ वे | अंक ६० वा | मंगळवार, दिनांक १९ मे २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)    कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## अवैध गांजा विक्री रॅकेटवर लातूर स्थानिक गुन्हे शाखेचा घणाघात

### ७ लाख ४२ हजार रुपयांचा तब्बल २४ किलो ७४० ग्रॅम गांजा जप्त | एक आरोपी जेरबंद

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर जिल्ह्यात अवैध अंमली पदार्थांच्या विरोधात सुरू असलेल्या कठोर मोहिमेंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अत्यंत नियोजनबद्ध आणि धाडसी कारवाई करत तब्बल ७ लाख ४२ हजार २०० रुपये किंमतीचा २४ किलो ७४० ग्रॅम वजनाचा गांजा जप्त केला असून, एका आरोपीस रंगेहाथ ताब्यात घेण्यात आले आहे.पोलीस अधीक्षक, लातूर श्री अमोल तांबे यांनी अवैध धंदे, गांजा विक्री, मादक पदार्थांची विक्री,वाहतूक व साठवण करणाऱ्यांविरोधात कठोर मोहीम राबविण्याचे आदेश दिले आहेत. त्याच अनुषंगाने अप्पर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वाखाली पथके सक्रिय करण्यात आली आहेत.



दि. १८ मे २०२६ रोजी पोलीस उपनिरीक्षक प्रमोद देशमुख हे आपल्या पथकासह उदगीर शहर परिसरात अवैध धंद्यावर कारवाई करीत असताना त्यांना गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती प्राप्त झाली की, उदगीर येथील मोंढा रोडच्या डाव्या बाजूस असलेल्या साईनाथ मिर्च मसाला उद्योग या दुकानामध्ये एक इसम मोठ्या प्रमाणात गांजाची साठवण करून अवैध विक्री करीत आहे.

पोलीस उपनिरीक्षक प्रमोद देशमुख यांनी तात्काळ सदर माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळविली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. सुधाकर बावकर तसेच उदगीर शहर पोलीस स्टेशनचे प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. अनंत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण कारवाईचे नियोजन करण्यात आले.

नायब तहसीलदार, दोन शासकीय पंच, प्रमाणित वजन काटा धारक, फॉरेन्सिक विभागाचे अधिकारी, व्हिडिओग्राफर यांना सोबत घेऊन सर्व अधिकारी, पंच व कर्मचारी यांनी नियोजनबद्धरीत्या सायंकाळी सुमारे ५.४० वा.च्या दरम्यान पोलिसांनी साईनाथ मिर्च मसाला उद्योग येथे छापा टाकला. दुकानाची झडती घेतली असता दुकानाच्या कोपऱ्यात ठेवलेल्या पिवळ्या रंगाच्या पोत्यामध्ये हिरवट-काळसर रंगाचा व उग्र वास येणारा बि-मिश्रित सुका गांजाचा मोठा साठा आढळून आला.

दुकानात उपस्थित असलेल्या इसमास ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने आपले नाव

१) शुभरत्न ऊर्फ कपील वय १९ वर्षे, रा. फुले नगर, उदगीर जि. लातूर

असे सांगितले. पंच व पोलीस पथकाने सदर पोत्यामधील पदार्थाची पाहणी केली असता तो गांजा असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर त्याचे वजन केले असता सदर गांजाचे एकूण वजन २४ किलो ७४० ग्रॅम इतके भरले. बाजारभावानुसार जप्त करण्यात आलेल्या गांजाची किंमत तब्बल ७ लाख ४२ हजार २०० रुपये इतकी असल्याचे निष्पन्न झाले.

शुभरत्न ऊर्फ कपील हा सदर गांजा अवैध विक्री व्यवसायासाठी साठवून ठेवत असल्याचे निष्पन्न झाले असून त्याने गांजा कोठून आणण्यात आला, त्याचे इतर साथीदार कोण आहेत, याबाबत सखोल तपास सुरू आहे.

या प्रकरणी आरोपीविरुद्ध गुंगीकारक औषधी द्रव्ये आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ अंतर्गत कलम ८(क), २०(ब)(ळळ)(क) अन्वये पोलीस ठाणे उदगीर शहर येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

सदर उल्लेखनीय कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे, यांचे आदेशान्वये, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी उदगीर गजानन भातलवंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर, पोलीस निरीक्षक श्री अशोक अनंत्रे यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक श्री. प्रमोद देशमुख, पोलीस अंमलदार संजय कांबळे, सूर्यकांत कलमे, सचिन धारेकर, पाराजी पुट्ठेवाड, तुळशीराम बरूरे तसेच उदगीर शहर पोलीस स्टेशनचे पोलीस अंमलदार हारणे, पवार, गवळी यांनी संयुक्तपणे पार पाडली.

लातूर पोलीस दलाकडून समाजविघातक प्रवृत्ती, अंमली पदार्थ विक्रेते व युवकांचे आयुष्य उद्ध्वस्त करणाऱ्या अवैध धंद्यांविरोधातील कार्यवाही यापुढेही अधिक तीव्रतेने सुरू राहणार असल्याचे पोलिस प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. युवकांनी कोणत्याही प्रकारच्या अंमली पदार्थांपासून दूर राहावे तसेच अशा अवैध धंद्यांबाबत माहिती असल्यास पोलिसांना तात्काळ कळवावे, असे आवाहन देखील पोलिस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## उन्हाचा पारा वाढला; तीव्र पाणी टंचाई

**अहमदपूर/प्रतिनिधी :** पाणीटंचाईचे चटके जाणवू लागले आहेत. सूर्यदेवाच्या रौद्ररूपामुळे विहिरी, विंधन विहिरी आणि जलस्रोत कोरडे पडू लागले आहेत. तसेच प्रकल्पांतील जलसाठ्यातही झपाट्याने घट होत आहे. पाणीपातळी खालावल्यामुळे तालुक्यातील काही गावांत तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे. घागरभर पाण्यासाठी नागरिकांना वणवण भटकावे लागत आहे. दरम्यान, ग्रामपंचायतींकडून टंचाई निवारणासाठी प्रस्ताव दाखल होत आहेत. तालुका प्रशासनाने तातडीने पाहणी करुन उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात येत आहे.

## तळीखेड पाटीजवळील अपघात रुग्णवाहिके अभावी जखमीची रस्त्यावर तडफड

### कार-ऑटो अपघातात ५ जण गंभीर जखमी

**निलंगा/मोईज सितारी:** लातूर-जहिराबाद राष्ट्रीय महामार्गावरील तळीखेड पाटीजवळ कार आणि टमटम यांच्यात समोरासमोर झालेल्या भीषण धडकेत ५ जण गंभीर जखमी झाले आहेत. रस्त्यावरील मोठा खड्डा चुकविण्याच्या प्रयत्नत हा अपघात घडल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. दरम्यान, अपघातानंतर '१०८' रुग्णवाहिकेशी वारंवार संपर्क साधून ही रुग्णवाहिका डिझेल अभावी घटनास्थळी पोहोचू शकली नाही. त्यामुळे जखमींना तब्बल अर्धा तास रस्त्यावरच वेदनांनी तडफडत पडून राहावे लागले.

दि. १७ मे रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास टमटम (एमएच १४ जेपी ६७२३) औरादहून निलंग्याकडे येत होती तर कार (एमएच १२ पीएन ३९२३) औरादकडे जात होती. तळीखेड पाटीजवळ रस्त्यावर मोठा खड्डा असल्याने कार चालकाने वाहन अचानक उजव्या बाजूला घेतले. त्याचवेळी समोरून येणाऱ्या टमटमवर कारची जोरदार धडक झाली.

यात दोन्ही वाहनांचा चक्काचूर झाला. या अपघातात टमटममधील लक्ष्मीबाई प्रकाशराव मसलगे यांचा पाय गंभीररीत्या जखमी झाला असून त्यांची प्रकृती चिंताजनक आहे. प्रकाश नरशिंगराव मसलगे यांच्या डोक्याला व पायाला गंभीर दुखापत झाली आहे. इंदू प्रकाश मसलगे व सिंधू प्रकाश मसलगे या दोघींना किरकोळ मार लागला . कारमधील मीनाक्षी पुरुषोत्तम मंत्री यांच्या पायाला गंभीर दुखापत होऊन हाड फॅक्चर झाले आहे. पुरुषोत्तम दगडू मंत्री, वैष्णवी जुगलकिशोर मंत्री आणि वसुधा जुगलकिशोर मंत्री यांनाही हात, पाय व डोक्याला गंभीर मार लागला आहे. अपघातानंतर नागरिकांनी तात्काळ '१०८' क्रमांकावर संपर्क साधून शासकीय रुग्णवाहिका बोलावली मात्र रुग्णवाहिकेत डिझेल नसल्याचे कारण देत सेवा उपलब्ध होऊ शकली नाही, असा आरोप नागरिकांनी केला आहे. अखेर स्थानिक ग्रामस्थ आणि प्रवाशांनी

पुढाकार घेत खासगी वाहनांमधून जखमींना निलंगा उपजिल्हा रुग्णालय व खासगी रुग्णालयात दाखल केले. गंभीर जखमी असलेल्या मीनाक्षी मंत्री आणि लक्ष्मीबाई मसलगे यांना पुढील उपचारासाठी लातूरला हलविण्यात आले. प्रकारच्या अंमली पदार्थांपासून दूर राहावे तसेच अशा अवैध धंद्यांबाबत माहिती असल्यास पोलिसांना तात्काळ कळवावे, असे आवाहन देखील पोलिस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## पावसाच्या भीतीने बाजारात दररोज १० टनांची आवक | जिल्ह्यातील व्यापाऱ्यांचे गणित बिघडले

**लातूर/प्रतिनिधी :** स्थानिक बाजारपेठेत सध्या आंब्याचा हंगाम ऐन भरात असला तरी, यंदा उत्पादक आणि व्यापारी दोघांसाठीही तो प्रचंड तोट्याचा ठरत असल्याचे चित्र आहे. लातूरच्या फळ बाजारात सध्या दररोज तब्बल १० टन आंब्याची आवक होत आहे. मात्र, बाजारात म्हणावा तसा ग्राहकांचा उठाव नसल्याने आंब्याचे दर कमालीचे कोलमडले आहेत. आवक भरपूर आणि मागणी कमी, अशा दुहेरी संकटामुळे व्यापाऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. लातूर बाजारात सध्या शेजारील कर्नाटक राज्यातील बसवकल्याण परिसरातून मोठ्या प्रमाणावर आवक सुरू आहे. यात विशेषतः 'कर्नाटक केशर' आंब्याला ग्राहकांकडून अधिक पसंती मिळत आहे. या परराज्यातील आवकीसोबतच आता जिल्ह्यातील ग्रामीण भागातील स्थानिक आंबाही बाजारपेठेत दाखल झाला आहे. एकाच वेळी दोन्ही बाजूंनी आवक वाढल्याने बाजारात आंब्याचे ढीग साचले आहेत. लातूर फळ बाजारात केशरसोबतच बदामी, दशेरी, तोतापुरी आणि लालबाग या वाणांची आवक सुरू आहे. दरात मोठी घसरण झाल्याने हे सर्व प्रकार सर्वसामान्यांच्या आवाक्यात आले आहेत. मागणी घटल्यामुळे ग्राहकांना फायदा होत असला तरी, व्यापाऱ्यांचे आर्थिक गणित मात्र बिघडले आहे. सध्या बाजारात कर्नाटक केशर ५० ते १०० रुपये, तर ग्रामीण भागातून आलेला स्थानिक केशर आंबा अवघ्या ४० ते ६० रुपये प्रति किलो दराने विकला जात आहे. चालू हंगामातील हे सर्वांत नीचांकी दर मानले जात आहेत. यंदा आंब्याचे उत्पादन चांगले होऊनही बाजारात मंदी आहे.

## प्रभात किरणे

देव आणि दानव पदोपदी भेटतात
चांगले आणि वाईट अनुभव येतात
विवेकीचा अभाव,बुद्धीचा न वापर
ऐसे जनाचे जीवन,जगणे खडतर

- इंजि. नागनाथ कलवले, लातूर
९७६४७ ८८२८८

## कुजबुज

- डॉ. संजय जमदाडे



महावितरण ची 'स्मार्ट' योजना, २५ वर्ष वीज मोफत...

## चिमटा दयाचा



पापाचा घडा भरल्यावर
काय होत हे लातूरकरांना
दिसून आले आहे !
वेळीच सावध होणे यासाठी
'हे' उदा. उत्तम आहे !!

## एमआयटी फार्मसी ची कु. प्रणिता झिरमाळे विद्यापीठात सर्वप्रथम आ. रमेशआप्पा कराड यांच्याकडून अभिनंदन



**लातूर/प्रतिनिधी :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठद्वारे घेण्यात आलेल्या औषध निर्माणशास्त्र (बी फार्मसी) प्रथम वर्ष परीक्षेत लातूर येथील महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मासुटिकल सायन्सेस महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. प्रणिता झिरमाळे हिने ९.२६ एसजीपीए गुण घेऊन संपूर्ण विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळवला आहे. या यशाबद्दल लातूर एमआयटीचे कार्यकारी संचालक आ. रमेशआप्पा कराड यांनी यथोचित सत्कार करून अभिनंदन केले.

लातूर एमआयटीचे महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मासुटिकल सायन्सेस हे औषध निर्माण शास्त्र महाविद्यालय दोन वर्षांपूर्वी सुरू झाले असून या महाविद्यालयात अद्यावत प्रयोगशाळा, स्मार्ट क्लास रूम, डिजिटल ग्रंथालय आणि सुसज्ज इमारत असून तज्ञ प्राध्यापकाच्या मेहनतीने प्रारंभापासूनच गुणवत्तेकडे प्राधान्याने लक्ष दिले जात आहे.

महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मासुटिकल सायन्सेस महाविद्यालयातील विद्यार्थिनी कु. प्रणिता झिरमाळे हिने ९.२६ एसजीपीए गुण घेऊन संपूर्ण विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळवला आहे तसेच महाविद्यालयातील कु. संजीवनी कांबळे ८.७२ एसजीपीए कु. दुर्गा किर्दंत व ओमकार सुरोशे ८.६३ एसजीपीए गुण घेऊन महाविद्यालयात अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल तिन्ही गुणवंत विद्यार्थ्यांचे एमआयटीचे कार्यकारी संचालक तथा लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी यथोचित सत्कार करून कौतुक केले व भविष्यातही अशाच उल्लेखनीय यशाची कामगिरी करतील अशी अपेक्षा व्यक्त केली.

## फोटो स्टोरी

### पेपरफुटीचा फटका; ट्यूशन एरियात क्लासेस बंद; पालकांचा जीव टांगणीला



**लातूर/प्रतिनिधी :** सीबीआयने खासगी क्लासेसचे संचालक प्रा. शिवराज मोटेगावकर यांना अटक केल्याने लातूर शहरात एकच खळबळ उडाली आहे. या कारवाईच्या धसक्याने शहरातील प्रसिद्ध 'ट्युशन एरिया'तील मोटेगावकर यांच्यासह इतर अनेक कोचिंग क्लासेस सोमवार (दि. १८ मे) पासून पूर्णपणे बंद ठेवण्यात आले आहेत. मोटेगावकर यांच्या क्लासेसला २ जूनपर्यंत सुटी देण्यात आली आहे.

लातूरमध्ये नीट आणि जेईई परीक्षेच्या तयारीसाठी राज्यभरातून हजारो विद्यार्थी दाखल होतात. ग्रामीण भागातील पालक लाखो रुपये खर्चून आपल्या पाल्यांना येथे शिक्षणासाठी पाठवतात. मात्र, नीट पेपरफुटीचे प्रकरण आणि सीबीआयने थेट क्लास चालकाला अटक केल्याने, एरवी विद्यार्थ्यांच्या गर्दीने गजबजणारा हा परिसर आता शुकशुकाटात बुडाला आहे. आरसीसीसह इतर बहुतांश क्लासेस बंद असल्याने विद्यार्थी या परिसराकडे फिरकले नाहीत. पूर्वपरीक्षा तोंडावर आली असतानाच हा प्रकार घडल्याने सराव परीक्षा होणार की नाही, असा प्रश्न निर्माण झाला आहे. मोठे शैक्षणिक नुकसान होत असून पालकांमध्येही चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

यंदा नीट पेपर सोपा होता. यासाठी चांगला अभ्यास केला असून, ६५०+ स्कोअर गेला होता. काही पुस्तके विकून गावाला गेलो होतो. पुन्हा एकदा पेपर द्यावा लागणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांवर दबाव वाढला आहे. आम्ही नीट पुनर्परिक्षेस तयार आहोत. यावेळी ६०० पेक्षा अधिक गुण मिळण्याची आशा होती. पुढेही यापेक्षा अधिक गुण मिळविण्यासाठी मिळालेल्या दिवसात अभ्यास करीत आहे. मात्र, यावेळी सुरक्षित पेपर व्हायला हवेत. आम्ही १२-१४ तास मेहनत करतो, लाखों रुपये खर्च करून परीक्षा देतो. मात्र, पेपर फुटीमुळे काही काळ का असेना निराशा येते. आता, पुन्हा पेपर फुटीवर लक्ष देण्याची गरज आहे असे विद्यार्थी मध्ये चर्चा सूरू आहे.

#### लाखों रुपये खर्च करून परीक्षा दिली

**दोन वर्षात केले मुलाच्या शिक्षणावर १० लाख खर्च मला चार एकर शेती आहे. मुलाच्या शिक्षणासाठी अर्धा एकर शेती विकली. त्याचे साडेतीन लाख रुपये आले. एकुलता एक मुलगा हुशार असल्यामुळे गाव सोडले आणि १३० किलोमिटर दूर लातुरला येवून शिफ्ट झालो आणि मुलाच्या शिक्षणा-वर लक्ष केंद्रित केले. गेल्या दोन वर्षात त्याच्यावर दहा लाखांच्या आसपास खर्च झाला आहे. परंतु आता नीटचा पेपर फुटल्यामुळे पुन्हा नैराश्य आहे. अशामुळे आमच्या सारख्यांचे मोठे नुकसान होत आहे.**

#### पुस्तके विकून गावाला गेलो.. विद्यार्थी

*गुणवंतांना संधी मिळेल मी आरसीसी क्लासचा विद्यार्थी असून, या क्लासचे सर्व वर्ग पूर्ण केले आहेत. भरलेले पैसेही फिटले असून, क्लासकडून कोणतीही अपेक्षा नाही. सध्या, सेल्फ अभ्यास करीत आहे. पूर्वपरीक्षा घेण्यात येत असल्याने समाधान वाटत असून, गैरप्रकाराने पेपर देणारे आता राहणार नाहीत. गुणवंतांना संधी मिळेल.*

*- अमित नागरगोजे, विद्यार्थी*

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## बदलत चाललेली मानसिकता

राज्यात काहींच्या मानसिकतेत बदल होत आहे. त्यामुळे हिंसक वृत्तीत वाढ होत आहे. सर्वाधिक घटना मुलीवरील अत्याचाराच्या होताना दिसून येत आहेत. लहान बालिकेवर अत्याचारच्या घटनमुळे मानसाची मानसिकता बदलत चालली आहे हे दिसून येते. विकृतमने का होत आहेत. पुर्वी अशा घटना घडत नव्हत्या का? आताच का घडत आहेत. याबाबत चिंता बरोबर चिंतनाची वेळ आली आहे. मोठ्या शहरात वाईट घटनेत वाढ झाली आहे. याला जबाबदार कोणाला धरावे. वाईट विकृतीचे माणसे पुर्वी होते व आजही आहेत. मग आताच वाईट कृत्याचा कळस का गाठला आहे. यामागील कारणे कोणती आहेत, याचा शोध घेवुन विचार केला पाहिजे. सतत मुलीवर अमानुष अत्याचार वाढत आहेत. मुलीचे वय पाहुन तरी दयामाया आली पाहिजे. जनावरांना लाजवेल असे कृत्य माणसाच्या हातून होताना दिसून येत आहे. जनावरे सुद्धा वेळ व काळ पाहुन काम करतात. माणुस त्यापेक्षाही घृणास्पद काम करीत आहे हे अतिषय वाईट व निंदणीय आहे. घृणास्पद कार्यात वाढ होत आहे. दररोज घटना कोठेतरी घडत आहेत. लैंगिक अत्याचाराच्या घटनेत वाढ होत आहे. दोष कुठे आहे हे शोधले पाहिजे. महिला व मुली गायब होण्याचे प्रकार वाढले आहेत. त्याच प्रमाणे अतिषय लहान मुली यात बळी पडत आहेत. नराधामाचा आटकाव होताना दिसून येत नाही. नराधाम कशामुळे बावचाळला जात आहे. याला आळा घालता येत नाही का? पुर्वी अशी वाईट वृत्तीची मंडळी होती मात्र छत्रपतींच्या काळात कायदा कडक होता. हात-पाय तोडणे, सुळावर चढविणे, भरचौकात फटक्याची शिक्षा म्हणजेच शिक्षा ह्या कडक होत्या. त्यापेक्षाही न्यायदान कडक व तातडीने होत होते. पंचायत असो किंवा राजाच्या दरबारातच पिडीतांना न्याय मिळत होता. आता तसे नाही. जलद न्यायालयात केस चालविली जाईल व न्याय मिळेल असे सांगितले जाते. जलद न्यायालयातून किती जणास तातडीने न्याय मिळाला आहे किंवा किती प्रकरणे प्रलंबित आहेत याचा विचार करावा. केवळ जलद असे नाव दिले असले तरी ते निवांतच दिसून येतात. त्याच प्रमाणे एखादी घटना घडल्यावर जनता किती संवेदनशील बनते याचाही विचार केला पाहिजे. आंदोलन करते ते तात्पुरते कायम निकाल लागेपर्यंत कोणतीही आंदोलने होत नाहीत. मुलीवरील अन्याय, अत्याचाराच्या घटना किती घडल्या आहेत याचे प्रमाण किती आहे. त्यापेक्षा किती जणीस न्याय मिळाला आहे याचा विचार जनतेनी केला पाहिजे. मुळात आपल्या राज्यात मुलीवरील अत्याचाराचे प्रमाण वाढते आहे. किती घटना घडत आहेत, पुर्वीच्या पिडीतास न्याय मिळाला नाही तर दुसऱ्या घटना घडत आहे. त्यामुळे गुन्हेगारात भिती राहीली नाही. असे निडर व्यक्तीचे प्रमाण वाढते आहे. काय होतय म्हणाऱ्याची प्रमाण वाढते आहे त्यापेक्षाही शिक्षा काय होणार? असे बोलणारे आहेत. आपल्या देशात न्यायप्रणाली गतीमान झाली पाहिजे. चौकशावर चौकशा, तपास यंत्रणा समोर किंवा पुरावा आदि देता-देता एखादा व्यक्ती खचून जात आहे. पिडीतास न्याय तातडीने मिळाला पाहिजे. वास्तकिव न्यायदेवता पेक्षा पालिसांना खरा गुन्हेगार कोण आहे हे ओळखण्याची खास शैली असते. त्यामुळे पोलिसांना कोण गुन्हा केला व कोण दोषी, कोण निर्दोष आहे कळून येते. तरीही भारतातील न्याय व्यवस्थेत तारीख पे तारीख होते हे आता सर्वांना कळाले आहे, मुळात न्यायदानाची प्रक्रिया गतीमान करावी लागेल, त्याच प्रमाणे शिक्षा ही कडक असली पाहिजे. जी छत्रपतींच्या काळात होती तशी असली पाहिजे. जो पर्यंत मनाचा थरकाप उडविणारी शिक्षा व त्याची अमलबजावणी होणार नाही तो पर्यंत अशा घटनेत घट होणार नाही. त्यापेक्षाही समाजात वाईट प्रदर्शन होत आहे. समाज व्यवस्थेत जे घाणेरडे प्रदर्शन होत आहे. भावना उत्तेजीत होणारे प्रकार सोशलमिडीयावर वावर वाढला आहे. याला पायबंद घातला पाहिजे. किळसवणी प्रकार पाहुन, उत्तेजित होवून आत्त्याचार करीत आहेत याला वेळीच लगाम लावला पाहिजे. ठराविक व्यक्तीच असा चुकीचा मार्ग आवलंबतात, त्यामुळे कडक धोरण व आवलंबनाची गरज आहे. काही झाले तरी चुकीचे प्रकार वाढत आहेत. बालिकेवर आमानुष अत्त्याचार होत आहेत. केवळ अत्त्याचारावर करणारे नराधाम थांबत नाही तर जीवे मारत आहेत. हे किती वाईट आहे. सामाजिक कार्यकर्ते तेवढ्यापुरते उठाव करीत आहेत. तडीस प्रकरण घेवुन जात नाहीत. आंदोलनकर्ते रस्ता रोको, रात्रीच्यावेळी हातात मेनबत्त्या घेवून मिरवणुक काढणे, आदि प्रकाराने आत्त्याचार थांबतील का? मुळात कुटुंब व्यवस्थाच बिघडत आहे. पालकांचा मुलीशी संपर्क कमी होत आहे. मुलींस आत्मसंरक्षणाचे धडे शिकविले जात नाहीत. मोबाईल पेक्षा तीला आत्मसंरक्षणासाठी एखादे शस्त्र चालविणे, बाळगण्याचे प्रशिक्षण दिले पाहिजे. आज धर्मांतराच्या घटना वृत्तपत्रातून वाचण्यात मिळत आहे. एखादीने तरी समोरच्या नराधामास धडा शिकविला का? दोन हात करण्यासाठी सरसावले का? केवळ ओरड होते. एकतर निर्णय लवकर लागत नाही. दुसरो असे की, मोठी शिक्षा झाली असे ही घडताना दिसून येत नाही. घटना घडली आरोपीला पकडणे, जलद न्यायालयात प्रकरण चालविण्याचे आश्वासने दिली, समोरच्यांना कसे शांत करता येईल असेच प्रकार दिसून येत आहे. वाईट घटना कशा कमी होतील, ज्यावेळी कठोर शिक्षा होईल, छत्रपतींच्या काळात कोणतीही योजना श्रावणबाळ, निराधार आदि नसताना त्यांचे चांगले राज्य संबोधले जात आहे. आज सर्व सुविधा आहेत. एसटी मोफत, दिड हजार महिण्याला ठराविकाना सुविधा चालू आहेत. त्यापेक्षा महिलावरील अत्त्याचाराच्या घटना होतात हे सर्वात वाईट आहे. जो पर्यंत ठोस पर्याय शोधणार नाही तो पर्यंत मुलींना असुरक्षित वाटणे स्वाभाविक आहे. एवढे होवून शाळेतून आत्मसंरक्षणाचे धडे दिले जात नाहीत. शाळाच आता सुरक्षित आहेत का असा प्रश्न समोर येत आहे. सरकारने आपले काम करताना या महत्त्वाच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करू नये. काही झाले तरी पिडीतास कसा न्याय मिळेल, कठोर दंड कसा प्रकारे मिळेल याचा विचार करावा. अत्त्याचार करताना कायद्याची भिती वाटली पाहिजे असे काही तरी करण्याची गरज आहे.

# तीर्थक्षेत्र विकासकामे दर्जेदार सुविधांसह कालमर्यादेत पूर्ण करावीत-मुख्यमंत्री फडणवीस




मुंबई, दि. १८ : राज्यातील ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळांच्या जतन व संवर्धनास शासनाचे प्राधान्य असून तीर्थक्षेत्र विकास आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करावी. तसेच भाविक-पर्यटकांसाठी अत्याधुनिक सोयी सुविधासह आरोग्यसुविधाची उपलब्धता करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. यावेळी शिखर समितीच्या बैठकीत सहा तीर्थक्षेत्र विकासासाठी एकूण ९९३.७२ कोटी रुपयांच्या विकास आराखड्यांना आणि निधीला मंजुरी देण्यात आली.

सह्याद्री अतिथीगृह येथे विविध तीर्थक्षेत्र विकास आराखडा शिखर समितीची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार,वनमंत्री गणेश नाईक, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले,आमदार दिलीप वळसे पाटील, आमदार धनंजय मुंडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह सर्व संबंधित अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**श्री क्षेत्र भीमाशंकर आदर्श गाव विकासाठी १७२ कोटींची तरतूद**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, श्री क्षेत्र भीमाशंकर ज्योतिर्लिंग क्षेत्राच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासासाठी कामे करावीत.या विकास आराखड्याअंतर्गत अत्याधुनिक बस स्थानक आणि पार्किंग सुविधा करण्यात यावी. या कामांसाठी जागांचे भूसंपादन वेळेत करावे. या प्रकल्पासाठी सुमारे १७२.२२ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे मे २०२७ पर्यंत काम पूर्ण करावे. वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी विविध वळण रस्ते आणि रस्ते रुंदीकरणाची कामे हाती घेण्यात यावीत. सध्या २.७ मीटर रुंदी असलेले रस्ते ७ मीटरपर्यंत रुंद करावा. भक्त आणि पर्यटकांच्या सुविधांसाठी मंदिर परिसरात पादचारी मार्ग, कव्हर्ड कॉरिडॉर, फ्लोअरिंग आणि एम्फीथिएटर, २५७ केएलडी क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, नवीन पोलीस स्टेशन आणि विश्रामगृह, भविष्यातील विकास आराखड्यांतर्गत डिंभे धरण परिसरात सबस्टेशन उभारणे, केबल कार (रोपवे) सुविधा सुरू करणे, एमटीडीसीच्या भीमाशंकर रिसॉर्टचा विकास करणे, राजापूर येथे नव्या पर्यटन सुविधांची निर्मिती करण्याचे नियोजन काटेकोरपणे करावे. आमदार बाबाजी काळे यांनी श्री क्षेत्र भीमाशंकर आदर्श गाव विकास आराखड्यात सूचना केलेल्या कामांचा आराखड्यात समावेश करण्याच्या सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी केल्या.

**संत तुकाराम महाराज जन्मस्थानाच्या संवर्धनासाठी ४१ कोटींची तरतूद**

संत तुकाराम महाराज यांचे देहू येथील जन्मस्थान, वैकुंठगमन मंदिर परिसर तसेच भंडारा डोंगर परिसराच्या संवर्धन आणि विकासासाठी सर्वंकष आराखडा ४१.७१ कोटींचा आहे. या आराखड्यात संत तुकाराम महाराज जन्मस्थान मंदिर, वैकुंठगमन स्थळ, भंडारा डोंगर आणि परिसरातील इतर धार्मिक व ऐतिहासिक स्थळांचे संवर्धन करावे. यामध्ये रस्त्यांचे सुशोभीकरण, स्वच्छता व्यवस्था, पिण्याच्या पाण्याच्या सुविधा, पार्किंग व्यवस्था, भाविकांसाठी निवास सुविधा तसेच माहिती केंद्र उभारणे, भंडारा डोंगर परिसरात हरित क्षेत्र संवर्धन, वृक्षारोपण आणि नैसर्गिक सौंदर्य अबाधित ठेवण्यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात. आमदार सुनिल शेळके यांनी संत तुकाराम महाराज जन्मस्थानाच्या संवर्धन आराखड्यात सूचविलेल्या कामांचा आराखड्यात समावेश करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

**किल्ले अजिंक्यतारा जतन आणि संवर्धनासाठी १३४.८० कोटींची तरतूद**

सातारा जिल्ह्यातील ऐतिहासिक किल्ले अजिंक्यताराचे जतन, संवर्धन आणि परिसर सुशोभीकरणासाठी १३४.८० कोटी रूपयांचा विकास आराखडा आहे. यामध्ये नियोजित असलेल्या पायाभूत सुविधांचा विकास, नियोजित प्रेक्षक गॅलरी, नवे पादचारी मार्ग व लँडस्केपिंग,राज सदरेचे पुनरुज्जीवन, बुरूजांचे संवर्धन, पर्यटन आकर्षणे,अत्याधुनिक लटकता पूल,स्वच्छता व विश्रांती गृहांची कामे, तज्ज्ञांचे मार्गदर्शनाखाली नियोजित कामे वेळेत पार पाडावीत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

**संगम माहुली (सातारा) समाधी स्थळ संवर्धन प्रकल्पासाठी १३३ कोटींची तरतूद**

संगम माहुली समाधीस्थळ संवर्धनासाठी १३३ कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. याअंतर्गत महाराणी ताराबाई, महाराणी येसूबाई आणि छत्रपती शाहू महाराज यांच्या समाधी स्थळांचा जीर्णोद्धार आणि लँडस्केप विकास केला जाणार आहे. याशिवाय, ऐतिहासिक संगमेश्वर मंदिर व घाटाचे संवर्धन, नवीन हँगिंग ब्रिज (झुलता पूल), व्ह्यूइंग गॅलरी आणि सुसज्ज पाथवेची निर्मिती करून या परिसराला जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ बनविण्यात येईल, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

**श्री क्षेत्र घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग विकास आराखडा (वेरुळ)साठी २१० कोटी रूपयांची तरतूद**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वेरुळ येथील प्रसिद्ध घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिराच्या विकासासाठी सुधारित आराखडा तयार करण्यात आला आहे. या प्रकल्पाची एकूण किंमत आता २१०.४५ कोटी रुपये प्रस्तावित करण्यात आली असून, यामध्ये ५३.८२ कोटींच्या वाढीव निधीची मागणी समाविष्ट आहे. सध्या या ठिकाणी भाविकांसाठी अत्याधुनिक भक्त निवास, दर्शन बारी (प्रतीक्षागृह), शॉपिंग कॉम्प्लेक्स, फंक्शन हॉल, घाट आणि १.६ किमीचा बाह्य वळण रस्ता (बायपास रोड) यांसारखी कामे गतीने करावीत, असे निर्देशही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

**श्री क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग मंदिर परिसर विकासासाठी ३०१.५४ कोटींची तरतूद**

श्री क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग मंदिर' परिसर मूळ आराखड्यातील पुढील नवीन कामांसाठी सुमारे ३०१.५४ कोटी रुपयांचा अतिरिक्त आराखडाही तयार करण्यात आला आहे. तीन टप्प्यात या मंदिराची कामे वेळेत पूर्ण करावीत. पहिला टप्पा (मुख्य मंदिर परिसर) विकासामध्ये भव्य प्रवेशद्वारे, डिजिटल रांग व्यवस्था, प्रतीक्षागृहे, अन्नछत्र, योग-ध्यान केंद्र आणि मंदिर परिसराचे सौंदर्यीकरण,दुसरा टप्पा (तीर्थ व पुरातन स्थळे): हरिहर व मार्कंडेय तीर्थांचे वैज्ञानिक पुनरुज्जीवन, घाट, सायकल ट्रॅक, दिव्यांगसुलभ सुविधा, फूड कोर्ट आणि सीसीटीव्ही सुरक्षा व्यवस्था उभारणे. तिसरा टप्पा (मेरू पर्वत विकास) मेरू पर्वतावर भव्य शिवमूर्ती, शिवपुराण व वैदिक संग्रहालय, म्फीथिएटर, लेझर लाईट अँड साऊंड शो आणि ध्यानस्थळे विकसित करा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

पुण्याचे जितेंद्र डुडी जिल्हाधिकारी यांनी श्री क्षेत्र भीमाशंकर आदर्श गाव विकास आराखडा व संत तुकाराम महाराज जन्मस्थान संवर्धन विकास आराखड्याचे सादरीकरण केले. बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी श्री क्षेत्र घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग विकास आराखडा व श्री क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग मंदिर परिसर विकास आराखड्याचे सादरीकरण केले. किल्ले अजिंक्यतारा जतन आणि संवर्धन व संगम माहुली (सातारा) समाधी स्थळ संवर्धन आराखडाचे सादरीकरण साताऱ्याचे जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी सादर केले.

# इंधन दरवाढीच्या पार्श्वभूमीवर एसटी भाडेवाढीचा प्रस्ताव विचाराधीन-परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**डिझेल दरवाढीमुळे एसटी महामंडळावर वार्षिक १२४ कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार**

मुंबई, दि. १८ : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वाढत्या इंधन खर्चाच्या पार्श्वभूमीवर प्रवासी भाडेवाढीचा प्रस्ताव विचाराधीन असला, तरी तत्काळ भाडेवाढ करण्यात येणार नसल्याची माहिती परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

डिझेल दरवाढीच्या पार्श्वभूमीवर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील दालनात महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर तसेच अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, डिझेलच्या दरात झालेल्या वाढीमुळे महामंडळावर वार्षिक सुमारे १२४ कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे. एसटी महामंडळाला दररोज सरासरी १०.८७ लाख लिटर डिझेलची आवश्यकता भासते. सध्या इंडियन ऑईल कॉर्पोरेशनमार्फत डिझेलचा पुरवठा केला जात असून, मागील आठवड्यात प्रति लिटर ८८.२१ रुपये असलेला दर आता वाढून ९१.३१ रुपये झाला आहे. त्यामुळे प्रति लिटर ३ रुपये १० पैशांची वाढ नोंदविण्यात आली आहे. या दरवाढीमुळे महामंडळाला दररोज अंदाजे ३३ लाख ७० हजार रुपयांचा अतिरिक्त खर्च सहन करावा लागत असून, मासिक स्तरावर हा भार सुमारे १० कोटी रुपये, तर वार्षिक स्तरावर सुमारे १२४ कोटी रुपयांपर्यंत जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, एसटी महामंडळ सध्या आर्थिक अडचणींचा सामना करीत असून, एप्रिल २०२६ मध्ये महामंडळाला सुमारे ७६ कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागला आहे. वाढत्या इंधन खर्चाचा थेट परिणाम महामंडळाच्या आर्थिक स्थितीवर होत असून, भविष्यात प्रवासी भाडेवाढीचा निर्णय घेणे आवश्यक ठरू शकते.

तथापि, कोणतीही भाडेवाढ तातडीने लागू करण्यात येणार नसून, केंद्र आणि राज्य शासनाच्या मार्गदर्शनाखाली इंधन दरवाढीच्या अनुषंगाने भाडेवाढीचा प्रस्ताव राज्य परिवहन प्राधिकरणाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात येणार आहे. संबंधित प्राधिकरणाची मान्यता मिळाल्यानंतरच अंतिम निर्णय घेण्यात येईल, असेही मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

एसटीने प्रवास करणाऱ्या सर्वसामान्य प्रवाशांवर कमीत कमी आर्थिक भार पडावा यासाठी शासन विविध पर्यायांचा विचार करीत असून, इंधन बचत, ई-बसचा वाढता वापर, खर्च नियंत्रण तसेच महसूलवाढीच्या उपाययोजनांवर विशेष भर देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

ग्रामीण भागातील नागरिकांसाठी एसटी ही अत्यावश्यक सार्वजनिक वाहतूक सेवा असून, सेवा अबाधित राखत आर्थिक संतुलन कायम ठेवणे हे महामंडळासमोरील प्रमुख आव्हान असल्याचेही मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

# पश्चिम आशियाई संकट: महाराष्ट्र शासनाचे एक महत्त्वपूर्ण आणि धाडसी पाऊल

**सर्वं राष्ट्रहितार्थम्। सर्व काही राष्ट्रासाठी!**

सध्या संपूर्ण जगाचे लक्ष पश्चिम आशियातील वाढता तणाव आणि अस्थिरतेकडे लागले आहे. या जागतिक संकटामुळे उद्भवू शकणाऱ्या संभाव्य आर्थिक आणि संसाधनांच्या टंचाईला तोंड देण्यासाठी केंद्र सरकारने आधीच देशपातळीवर पावले उचलली आहेत. याच पार्श्वभूमीवर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत महाराष्ट्र शासनाने एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि व्यापक शासन परिपत्रक जारी केले आहे.

राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या स्वाक्षरीने काढण्यात आलेल्या या परिपत्रकातून, प्रशासकीय स्तरावर दूरगामी बदल घडवून आणण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण उपाययोजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत.

हा केवळ एक प्रशासकीय आदेश नसून, संकटसमयी संसाधनांचे संवर्धन आणि आत्मनिर्भरतेकडे नेणारा एक महत्त्वपूर्ण आराखडा आहे. या परिपत्रकातील प्रमुख मुद्दे आणि त्याचे संभाव्य सकारात्मक परिणाम खालीलप्रमाणे आहेत:

**इंधन बचत आणि शाश्वत वाहतुकीला प्राधान्य**

पश्चिम आशियातील संकटामुळे सर्वात मोठा फटका इंधन पुरवठ्याला बसू शकतो. हे ओळखून शासनाने वाहतूक व्यवस्थेत आमूलाग्र बदलांचे संकेत दिले आहेत:

**इलेक्ट्रिक वाहनांना प्राधान्य:**

बाह्यस्त्रोतांकडून (ींििलळपस) घेण्यात येणाऱ्या वाहनांमध्ये इलेक्ट्रीक वाहनांना प्राधान्य दिले जाईल. तसेच चार्जिंग सेंटर्स उभारण्याच्या प्रस्तावांना तातडीने मंजुरी देऊन वीज दर कमी करण्याबाबत विचार केला जाईल.

**पब्लिक ट्रान्सपोर्ट आणि कारपूलिंग:**

शासकीय अधिकाऱ्यांना कार्यालयीन कामासाठी आणि एकत्रित दौऱ्यांसाठी 'कारपूलिंग' (उरीश्रिळपस) व सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर बंधनकारक करण्यात आला आहे. इतकेच नव्हे तर, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आठवड्यातून किमान एक दिवस मेट्रो, लोकल किंवा सार्वजनिक बसने प्रवास करणे आवश्यक केले आहे.

**मिरवणुकांवर बंदी:**

इंधनाचा अपव्यय टाळण्यासाठी पोलीस विभागाने कोणत्याही बाईक रॅली, वाहनांच्या मिरवणुका किंवा मोठ्या ताफ्यांना परवानगी देऊ नये, असे स्पष्ट निर्देश आहेत.

**आर्थिक शिस्त आणि परकीय चलनाचे संवर्धन**

जागतिक मंदी आणि संकटकाळात राज्याची तिजोरी आणि देशाचे परकीय चलन सुरक्षित ठेवण्यासाठी कडक पावले उचलली गेली आहेत:

**परदेश दौरे रद्द:**

शासकीय अधिकाऱ्यांचे अभ्यास किंवा शासकीय कामासाठीचे मंजूर असलेले सर्व परदेश दौरे रद्द करण्यात आले असून नवीन दौऱ्यांच्या नियोजनावर बंदी घालण्यात आली आहे.

**सल्लागारांच्या नेमणुकीला ब्रेक:**

पुढील ६ महिन्यांसाठी कोणत्याही प्रशासकीय विभागात नवीन सल्लागारांची (उेपीीश्रींरपीी) नेमणूक न करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, ज्यामुळे अनावश्यक आर्थिक भार टळेल.

**डिजिटल बैठकांवर भर:**

मंत्रालय, विभाग आणि जिल्हा पातळीवरील सर्व बैठका, सेमिनार आणि प्रशिक्षणे आता व्हीसी (तळवशे उेपषशीशपलळपस) किंवा ऑनलाइन पद्धतीनेच होतील. विद्यापीठे आणि महाविद्यालयांनाही याचे पालन करणे बंधनकारक आहे.

**ऊर्जा आणि पर्यावरण संवर्धन**

शासकीय कार्यालयांपासून ते सामान्यांच्या घरांपर्यंत ऊर्जेची बचत करण्यासाठी सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे:

**कार्यालयांमध्ये ऊर्जा बचत:**

कार्यालयीन वेळेत नैसर्गिक प्रकाशाचा वापर वाढवणे, काम संपताच दिवे, पंखे, संगणक, एसी आणि लिफ्ट बंद करणे बंधनकारक राहील. तसेच एसीचे तापमान २४ ते २६ अंश सेल्सिअसवर ठेवण्याचे निर्देश आहेत.

**सौरऊर्जेला गती:**

प्रधानमंत्री सूर्यघर योजनेच्या माध्यमातून जास्तीत जास्त घरांवर सौरऊर्जा यंत्रणा बसवण्यावर भर दिला जाईल.

**बॅनर आणि होर्डिंग्जवर मर्यादा:**

शासकीय जाहिराती माफक प्रमाणात करून अनावश्यक खर्च टाळला जाईल. फ्लेक्स, बॅनर आणि डेकोरेटिव्ह लाईट्सचा वापर कमी केला जाईल आणि होर्डिंग्जसाठी डीजी सेट (जनरेटर) वापरण्यास मनाई असेल.

अन्न सुरक्षा, पीएनजी आणि कृषी क्षेत्रातील सुधारणा संसाधनांच्या योग्य वापरासाठी थेट नागरिकांच्या जीवनशैलीशी जोडलेले निर्णय यात समाविष्ट आहेत:

**खाद्यतेलाचा तर्कसंगत वापर:**

कॅन्टीन, मध्यान्ह भोजन, हॉस्टेल्स, तुरुंग आणि रुग्णालयांच्या मेन्यूमध्ये बदल करून खाद्यतेलाचा वापर कमी केला जाईल. आशा वर्कर्स आणि अंगणवाडी सेविकांमार्फत घराघरांमध्ये समुपदेशन केले जाईल. तसेच आयात होणाऱ्या पाम किंवा सूर्यफूल तेलाऐवजी स्वदेशी मोहरी आणि शेंगदाणा तेलाला प्रोत्साहन दिले जाईल.

**पीएनजी (झछॠ) चा विस्तार:**

हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्सना अनिवार्यपणे पीएनजी वापरण्यास प्रवृत्त केले जाईल आणि प्रलंबित पीएनजी जोडण्यांना तातडीने मंजुरी दिली जाईल.

उज्ज्वला योजनेचे शुद्धीकरण:

प्रधानमंत्री उज्ज्वला योजना आणि सर्वसाधारण ग्राहकांमधील बोगस, दुबार किंवा स्थलांतरित ग्राहकांची नोंदणी रद्द करून खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत गॅस पोहोचवला जाईल.

**नैसर्गिक शेतीला बळ:**

रासायनिक खतांचा वापर कमी करण्यासाठी आणि युरियाचा गैर-शेती कामांसाठी होणारा गैरवापर रोखण्यासाठी कृषी विभाग मोठी मोहीम राबवणार आहे. माती परीक्षणावर आधारित पीक पद्धती आणि नैसर्गिक/सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन दिले जाईल.

**निष्कर्ष:**

महाराष्ट्र शासनाचे हे परिपत्रक केवळ तात्पुरती मलमपट्टी नसून, भविष्यातील मोठ्या संकटाला तोंड देण्याची पूर्वतयारी आहे. प्रशासकीय खर्चात कपात करणे, पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा वापर करणे आणि स्वदेशी संसाधनांवर भर देणे यांमुळे राज्याला आर्थिक स्थैर्य लाभेल.

मंत्रालयीन विभागांपासून ते अगदी जिल्हाधिकारी, महानगरपालिका आणि पोलिसांपर्यंत सर्वांना या नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

याचे पालन करणे ही जबाबदारी केवळ प्रशासकीय यंत्रणेचीच नव्हे, तर आता गरज आहे ती नागरिकांच्याही सक्रिय सहभागाची. जर आपण सर्वांनी मिळून या सूचनांचे पालन केले, तर हे 'संकट' आपण एका नव्या 'संधीत' बदलू शकू, यात शंका नाही.

चला तर आपल्यासाठी, आपल्या कुटुंबासाठी, आपल्या समाजासाठी, आपल्या राज्यासाठी आणि आपल्या राष्ट्रासाठी पंतप्रधानांच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देवून राष्ट्राप्रति आपले राष्ट्रप्रेम सिद्ध करू या..! वैचारिक आणि प्रत्यक्ष कृतीतून सक्रिय योगदान देवू या!

– **मनोज सुमन शिवाजी सानप,** जिल्हा माहिती अधिकारी ठाणे/रायगड तथा उपसंचालक (माहिती) (अ.का), कोकण विभागीय माहिती कार्यालय, बेलापूर, नवी मुंबई

# यशाचा हर्ष की संघर्ष?

शंतनु चिंचाळकर

दहावी-बारावीच्या निकालात उत्तीर्ण विद्यार्थ्यांची टक्केवारी घटली असली, तरी गुणवंतांच्या वाढलेल्या संख्येमुळे प्रवेशाचा पेच निर्माण झाला आहे. ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवूनही वैद्यकीय आणि अभियांत्रिकी प्रवेशासाठी विद्यार्थी आणि पालकांमध्ये चिंतेचे आणि संभ्रमाचे वातावरण पसरले आहे. त्यामुळे सद्यस्थितीत प्रवेशप्रक्रियेतील गुंतागुंत अधिकच वाढली आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा निकाल लागला की सर्वत्र पेढे वाटले जातात आणि उत्तीर्ण विद्यार्थ्यांवर कौतुकाचा वर्षाव होतो. मात्र, यंदाचे चित्र थोडे वेगळे आहे. एकूण निकालाचा टक्का मागील वर्षाच्या तुलनेत घसरला असला, तरी ९० टक्क्यांच्या पुढे गुण मिळवणार्‍या विद्यार्थ्यांची संख्या हजारोंच्या घरात आहे.८५ ते ९० टक्के गुण मिळवणार्‍या विद्यार्थ्यांनाही आता आवडीच्या कॉलेजमध्ये किंवा शाखेत प्रवेश मिळेल, याची खात्री राहिलेली नाही. निकालाचा आनंद साजरा करण्याऐवजी प्रवेश प्रक्रियेच्या कठीण पेचप्रसंगामुळे पालकां समोर चिंता आहे.कारण, विद्यार्थ्यांचे गुण वाढले, पण महाविद्यालयांमधील जागांची संख्या मर्यादितच राहिली. त्यामुळे 'कट ऑफ' उंचावले आहेत. विशेषतः मुंबई, पुणे, नागपूरसारख्या शहरांमधील नामांकित महाविद्यालयांमध्ये ९५ टक्क्यांवर प्रवेश थांबत आहेत.

वैद्यकीय (एमबीबीएस) आणि अभियांत्रिकी (इंजिनियरिंग) क्षेत्रातील स्पर्धा तर इतकी टोकाला गेली आहे की, एका गुणाच्या फरकाने विद्यार्थी गुणांच्या क्रमवारीत शेकडो क्रमांकांनी मागे जात आहे. बोर्डाचेच गुण नव्हे, तर नीट (एनईईटी) आणि सीईटीसारख्या स्पर्धा परीक्षांमधील प्रवेशासाठी असलेली आवश्यक टक्केवारी आणि त्यानंतर निर्माण होणारी गुणवत्ता यादी यामुळे विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना सुरुंग लागत आहे.

दुर्दैवाने आजच्या स्पर्धेच्या युगात नव्या आणि उदयोन्मुख क्षेत्रांबाबत विद्यार्थ्यांमध्ये कमालीची अनास्था आणि उदासीनता दिसून येते. बहुतांश विद्यार्थी आजही केवळ एका साचेबद्ध वृत्तीने किंवा सामाजिक दबावापोटी ठरावीक दोन-तीन पारंपरिक क्षेत्रांच्या मागेच धावताना दिसतात.

मेडिकल किंवा इंजिनिअरिंगला प्रवेश मिळाला नाही, तर त्यांचे संपूर्ण आयुष्यच व्यर्थ ठरेल आणि करिअरचे नुकसान होईल, ही भीती त्यांच्या मनात घट्ट बसली आहे. याच संकुचित मानसिकतेमुळे ते इतर नाविन्यपूर्ण आणि भविष्यात मोठी झेप घेऊ शकणार्‍या अभ्यासक्रमांकडे ढुंकूनही पाहत नाहीत. वास्तविक, अनेक आधुनिक व्यावसायिक अभ्यासक्रमांची माहितीच ग्रामीण किंवा निमशहरी भागातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत नाही आणि ही माहिती असणारेही त्याकडे केवळ एक दुय्यम पर्याय म्हणून बघतात. हीच अनास्था त्यांच्या करिअरच्या वाटा भविष्यात अधिक कठीण आणि आव्हानात्मक बनवत आहे. विद्यार्थी स्वतःच्या पारंपारिक चौकटीबाहेर पडून वैश्विक गरजांचा विचार करत नाहीत, तोपर्यंत प्रवेशाची चिंता आणि पालकांवरील दडपण वाढतच राहणार आहे.



केवळ डॉक्टर किंवा इंजिनिअर होणे म्हणजे यशस्वी करिअर घडणे नाही, हे आता समजून घेण्याची वेळ आली आहे. बदलत्या जगाच्या गरजा लक्षात घेता, सध्याच्या तंत्रज्ञानप्रधान युगात डेटा सायन्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय), सायबर सिक्युरिटी आणि फॉरेन्सिक सायन्स यांसारख्या क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत. कलात्मकता आणि सर्जनशीलतेची ओढ असणार्‍या विद्यार्थ्यांसाठी ग्राफिक डिझाइन, युआय/युएक्स आणि फॅशन टेक्नॉलॉजी हे अत्यंत सन्मानाचे पर्याय उपलब्ध आहेत. केवळ उपयोजित विज्ञानापुरते मर्यादित न राहता, शुद्ध विज्ञानात (प्युअर सायन्स) सखोल संशोधन करण्याची इच्छा असणार्‍यांसाठी आयसर (आयआयएसईआर) सारख्या जागतिक दर्जाच्या संस्था भारतात आहेत. वाणिज्य शाखेकडे वळणार्‍यांसाठी सीए किंवा बँकिंग व्यतिरिक्त ॲक्चुअरी सायन्स, स्टॅटिस्टिक्स किंवा फायनॅन्शिअल मॅनेजमेंट यासारखे जागतिक स्तरावरील प्रतिष्ठित पर्याय उपलब्ध आहेत. या ठिकाणी बौद्धिक कौशल्याला मोठा वाव आहे.


याशिवाय, हॉटेल मॅनेजमेंट, मास कम्युनिकेशन, डिजिटल मार्केटिंग आणि लिबरल आर्ट्स हे देखील उत्तम जीवनशैली आणि भरघोस पगाराची खात्री देणारे आधुनिक पर्याय म्हणून उदयाला आले आहेत. विद्यार्थ्यांनी केवळ प्रवाहाबरोबर वाहून न जाता स्वतःची आवड, नैसर्गिक कल आणि कौशल्याचा वस्तुनिष्ठ विचार करून या नव्या वाटा आत्मविश्वासाने चोखाळायला हव्यात. तरच ते या कट-ऑफच्या गर्दीतून बाहेर पडून स्वतःची वेगळी ओळख निर्माण करू शकतील.

आजकाल पालकांसाठी मुलांचे गुण हे समाजात मिरवण्याचे साधन बनले आहे. आपल्या पाल्याची बौद्धिक क्षमता, आवड आणि कल यांचा विचार न करता पालक डॉक्टर किंवा इंजिनिअर बनवण्याचा हट्ट धरतात. 'शेजार्‍याच्या मुलाला ९५ टक्के मिळाले, तर माझ्या मुलाला ९६ का नाहीत' हा प्रश्न मुलांवर प्रचंड मानसिक दडपण निर्माण करतो. प्रत्येक मुलाची बुद्धिमत्ता वेगळी असते. पालकांनी हे लक्षात घेतले पाहिजे की, ९० टक्के मिळवणारा प्रत्येक मुलगा सर्जन बनण्यासाठीच जन्मलेला नसतो. पालकांच्या या अवाजवी अपेक्षांमुळे मुले नैराश्याच्या गर्तेत ढकलली जात आहेत. ही बाब निकालाच्या टक्क्यांपेक्षाही अधिक चिंताजनक आहे. या दबावाचा अंत कधी कधी अत्यंत भीषण होतो. एखादा उमलता जीव टक्केवारीच्या या शर्यतीत स्वतःला कमी लेखू लागतो तेव्हा त्याच्या मनात पराभूत झाल्याची भावना घर करते. निकालाच्या दिवशी अपेक्षेपेक्षा दोन-चार टक्के कमी मिळतात तेव्हा पालकांच्या रागाला किंवा समाजाच्या उपहासाला सामोरे जाण्यापेक्षा तो प्रसंगी मृत्यूला जवळ करण्याचा टोकाचा निर्णय घेतो. एका क्षणात सर्व काही संपते. अशा वेळी झालेला पश्चात्ताप काहीच उपयोगाचा नसतो. एका चुकीच्या निर्णयामुळे पालकांच्या आयुष्यात कधीही भरून न येणारी मोठी पोकळी निर्माण होते. गुणांच्या या स्पर्धेमुळे केवळ एका मुलाचा जीव जात नाही, तर पालकांचे संपूर्ण आयुष्यही उद्ध्वस्त होते. आपण सामाजिक प्रतिष्ठेचा खोटा विचार आणि गुणांचा अतिरेकी हट्ट वेळीच सोडला नाही, तर भविष्यात अनेक सुखी कुटुंबे अशीच विखुरली जातील.

शिक्षण म्हणजे केवळ पदवी किंवा मोठा पगार मिळवणे नसून संकटांचा सामना करण्याची क्षमता मिळवणे होय. कट-ऑफच्या स्पर्धेत मागे पडलो म्हणजे आयुष्य संपले असे न मानता, इतर उपलब्ध संधींचा विचार करणे हेच खरे शहाणपण आहे. आज वैद्यकीय आणि अभियांत्रिकी क्षेत्राव्यतिरिक्त इतर अनेक क्षेत्रांमध्ये मोठ्या संधी उपलब्ध आहेत. पालकांनी स्वतःच्या अपेक्षांचे ओझे मुलांवर न टाकता आधार द्यायला हवा. 'गुण कितीही असोत, आम्ही तुझ्यासोबत आहोत' हा विश्वास मुलाला अशा संकटातून वाचवू शकतो. विद्यार्थ्यांनीदेखील नव्या क्षेत्रांची माहिती घेऊन त्यांचे स्वागत करायला हवे. आपण यशाची व्याख्या केवळ गुणांवरून ठरवणार नाही, त्याच दिवशी खर्‍या अर्थाने या समस्या सुटतील आणि मुलांचे होणारे नुकसान थांबेल. दहावी-बारावीचा निकाल चांगला लागला म्हणून केवळ पालकांच्या अट्टाहासापाई पाल्यांनी आपल्याला न झेपणार्‍या अभ्यासक्रमांकडे वळू नये. नामांकित महाविद्यालयात प्रवेश मिळो न मिळो, आपले भविष्य निवडलेल्या आपल्या आवडत्या विषयात आपण किती रस घेतो यावर अवलंबून आहे, याचा विद्यार्थ्यांनी विचार करणे आवश्यक आहे.

# अभ्यास कसा करावा?

अभ्यासाच्या प्रभावी टिप्सअभ्यासाचे नियोजन करा: दिवसाचे वेळापत्रक तयार करा आणि कोणत्या विषयाला किती वेळ द्यायचा आहे ते आधीच ठरवा.लक्ष विचलित करणाऱ्या गोष्टी दूर ठेवा: अभ्यास करताना मोबाईल फोन सायलेंट करा किंवा दूर ठेवा. टीव्ही किंवा इतर गोष्टींपासून लांब शांत जागा निवडा.योग्य बैठक व्यवस्था: अभ्यासाला बसताना पाठीचा कणा ताठ राहील अशी बैठक असावी. बेडवर झोपून अभ्यास करणे टाळा.छोटे ब्रेक घ्या: सलग तासनतास अभ्यास करण्याऐवजी प्रत्येक ४०-५० मिनिटांच्या अभ्यासानंतर ५-१० मिनिटांचा छोटा ब्रेक घ्या. यामुळे मेंदू ताजेतवाने राहतो. लिहून सराव करा: वाचलेला भाग अधिक चांगल्या प्रकारे लक्षात ठेवण्यासाठी तो स्वतःच्या भाषेत लिहून (छोंशी) काढा.योग्य आहार आणि झोप: रोज किमान ७-८ तासांची गाढ झोप घ्या आणि संतुलित व पौष्टिक आहार घ्या. यामुळे अभ्यास करताना आळस येत नाही.उजळणी करा: आठवड्यातून एकदा किंवा १५ दिवसांतून एकदा आधी अभ्यास केलेल्या भागाची उजळणी करा, जेणेकरून गोष्टी लक्षात राहतील.



# 'नीट' मधील उणिवा

रद्द झालेली 'नीट' परीक्षा आता येत्या २१ जून रोजी घेण्यात घेणार असून, पुढील वर्षापासून ही परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेण्याचे घाटत असल्याचे ताजे वृत्त परीक्षार्थींना दिलासा देणारे आहे.

देशातील वैद्यकीय शिक्षणासाठी सर्वांत महत्त्वाची समजली जाणारी राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा पेपरफुटीमुळे पुन्हा वादाच्या भोवर्‍यात सापडली आहे. तब्बल २३ लाख विद्यार्थ्यांच्या मनस्तापाला ते कारण ठरले आहे. यातील एका विद्यार्थ्याने या प्रकारानंतर आत्महत्या केली आहे. या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपवण्यात आला असला तरी विद्यार्थ्यांचा या परीक्षा पद्धतीवरील विश्वासालाच यामुळे तडा गेला आहे. काही विद्यार्थी संघटनांनी या घटनेचा निषेध केला, निदर्शने केली; पण ज्या विद्यार्थ्यांना याचा फटका बसला त्यांचे मनोबल कसे उंचावणार? या परीक्षेचा पेपर पंधरा दिवस आधीच विद्यार्थ्यांना मिळाला होता, तर काहींना परीक्षेच्या आधी काही तास व्हॉट्सॲपवरून तो मिळाला असल्याचे सांगण्यात येते. वैद्यकीय प्रवेशासाठी पूर्वी प्रत्येक राज्यांची स्वतंत्र परीक्षा घेण्यात येत असे. आता 'नीट'द्वारे वैद्यकीय शाखातील पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश दिला जातो. याआधी २०२४ मध्येही या परीक्षेचा पेपर फुटला होता. सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांची फी २० हजार ते ६० हजार दरम्यान, तर खासगी वैद्यकीय महाविद्यालयाची फी पाच लाखांपासून ४५ लाख प्रति वर्षी इतकी मोठी असल्याने सरकारी महाविद्यालयातील जागासाठी प्रचंड स्पर्धा असते. नीट परीक्षेमुळे स्पर्धा वाढली, कोचिंग क्लासेस वाढले. २०२४ मध्ये बिहारमध्ये नीट परीक्षेचा पेपर फुटल्याचे प्रकरण घडले होते. यावेळी नाशिकच्या मुद्रणालयातून पेपर चोरीला गेला, तो गुरूग्रामच्या एका डॉक्टरकडे तेथून जयपूर, हरयाना आणि केरळपर्यंत पोहोचला. गेसपेपरच्या नावाखाली ३० हजारापासून लाखो रुपये घेऊन तो विकला गेला. पेपर फुटल्याची खातरजमा झाल्यानंतर ही परीक्षाच रद्द करण्यात आली; मात्र यामुळे




२३ लाख विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लागले. परीक्षेसाठी वर्ष दीड वर्ष केलेली मेहनत, पालकांचे लाखो रुपये, मानसिक ताण हे सगळे वाया गेले. आता पुन्हा नव्याने परीक्षा, त्यासाठी पुन्हा शून्यापासून सुरुवात, त्यात पैसा आणि वेळ जाणार यात आमची काय चूक. या विद्यार्थ्यांच्या प्रश्नाचे उत्तर खरोखरच कोणाकडे नाही.

उपाय काय?

एखाद्या मोठ्या प्रमाणावर घेतल्या जाणार्‍या परीक्षेसाठी संबंधित यंत्रणेकडून पुरेशी दक्षता का घेतली जात नाही हा खरा मुद्दा आहे. प्रश्नपत्रिका फुटण्याची कारणे माहीत असूनही ते प्रकार रोखण्यासाठी उपाययोजना का झाल्या नाहीत, की या यंत्रणेतच भ्रष्टाचाराची कीड आहे, हे उघड व्हावयास हवे. खासगी क्लासेसची साखळीही अशा प्रकारात कार्यरत असण्याची शक्यता नाकारता येत नाही. डॉक्टर, संबंधित मुद्रणालयातील कर्मचारी, कोचिंग क्लास अशांची साखळीच पेपरफुटीमध्ये सामील असू शकते.

पेपर फुटीतील आरोपींना कठोर शिक्षा होत नाही, आरोपींना काही वर्षांत जामीन मिळू शकतो. आता कठोर शिक्षेचे कायदे आले तरी त्याची अंमलबजावणी व्हायला हवी. पेपर विकत घेऊन उत्तीर्ण झालेले डॉक्टर ज्ञानाने किती समृद्ध असतील हा प्रश्नच आहे. तेथे अनुभव आणि तुमचे ज्ञान हेच प्रत्यक्षपणे कामाला येतात. पेपर फुटीचे प्रकार टाळण्यासाठी परीक्षा पद्धतीत आमूलाग्र बदल करण्याची गरज आहे. त्या दृष्टीने परीक्षेचा पेपर सुरू होण्याआधी अर्धा तास परीक्षा केंद्रावर इंटरनेटद्वारे पेपर पाठवणे आणि पासवर्ड टाकून तेथेच त्याच्या प्रती काढणे हा उपाय व्यवहार्य ठरू शकेल. बर्‍याचशा परीक्षा याच पद्धतीने घेतल्या जातात. पेपर छपाईपासून परीक्षा हॉलपर्यंत प्रत्येक हालचालीची नोंद होणे आवश्यक करणे, जेवढे विद्यार्थी तेवढे प्रश्नसंच कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारे तयार ठेवणे, त्यात प्रश्नांचा, पर्यायांचा क्रम बदलला गेल्यास आधी पेपर विकत घेण्याचा पर्याय निरूपयोगी ठरू शकेल. एकाच दिवशी देशभर परीक्षा घेण्यापेक्षा नीट परीक्षा वर्षातून २-३ वेळा घेता येणे शक्य आहे. नीट परीक्षा ऑनलाईन केल्यास पेपरफुटीची शक्यता कमी होऊ शकेल. सरकारी फी आणि खासगी वैद्यकीय महाविद्यालयीन फी यातील दरी कमी झाल्यास गैरप्रकारांना आळा बसू शकेल. शिक्षणाच्या बाजारीकरणातून उद्भवलेली समस्या असे समजून त्याकडे दुर्लक्ष करणे योग्य होणार नाही.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा



६) जोडीदाराबरोबर सहवास ब्लड प्रेशर कमी करतो नवीन संशोधनानुसार सहवास आणि ब्लड प्रेशरचं आपआपसात एक संबंध असतो, सहवास ब्लड़ प्रेशर संतुलित करतं, ब्लड़ प्रेशर कमी करण्यात सेक्सची महत्वाची भूमिका असते.

७) जोडीदाराबरोबर सहवास एक सर्वोत्तम व्यायामव्यायाम आणि सेक्स हे एकमेकांसाठी पूरक मानले जातात, व्यायामाने तुम्हाला उत्साहीत वाटतं, तर सहवास तन-मनचा उत्साह वाढवण्यास मदत करतो. चांगल्या सेक्ससाठी सकारात्म विचार महत्वाचा आहे. सहवास एका प्रकारे तुमच्या शरीरात, सकारात्मक विचार रूजवतो. सहवासमुळे मिनिटाला पाच कॅलरीज बर्न होतात. यामुळे रोगाची प्रतिकारशक्ती वाढते, आणि तुमच्या आजारी पडण्याचं प्रमाण कमी होत जातं. सहवास शरीरारासाठी व्यायामाची भूमिका पार पाडतो, याचा फायदा शरीराला सर्व बाजुंनी होत असतो.

## २ Joke — विनोद




बंड्या उदास बसला होता. खंड्याने त्याला विचारले काय झालं रे?
बंड्या म्हणाला. मी क्रिकेट कॉमेंट्रिमुळे ऑफिसातून सस्पेंड झालो. खंड्या सहानभुती दर्शवित म्हणाला अरे पण ऑफिसात कॉमेंट्री कशाला ऐकायची? अरे बाबा, ऐकत नव्हतो म्हणून तर सस्पेंड झालोय. बॉसने जेव्हा स्कोअर विचारला तेव्हा मी हेडफोनवर गाणी ऐकत होतो ना.

## ३ Message — संदेश



Apki Ada, Apki Smile,
Apka Chehra, Apka Chalna,
Apka Bolna, Apka Sharmana,
Apki Julfein, Apki Aankhen,
Apka Andaz.... Uff Koi 1 Cheez
To Tarif K Kabil Hoti...

## ४ Thought — सुविचार




ज्याच्या जीवनामध्ये निश्चित ध्येय नसते त्यालाच वेळ घालविण्यासाठी साधन शोधण्याची गरज भासते.

**संस्कृत सुभाषित**

**प्राज्ञोपसेविनं वैद्यं धार्मिकं प्रियदर्शिनम्।**
**मित्रवन्तं सुवाक्यं च सुहृदं परिपालयेत्।।**

अर्थ - विद्वानांची सेवा करणारा, धार्मिक वर्तन करणारा, ज्याचे दर्शन प्रिय असते असा, मधुर बोलणारा, दयाबुद्धी बाळगणारा असा वैद्य असावा.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



## आडवे शब्द

१. दडपण, वजन
३. आकाशाला भेदणारा आवाज इत्यादी
८. गंध
१०. भ्रम
१२. बर्फाचा पर्वत
१४. गरजू
१६. रानात जाणारा रस्ता
१८. वाकबगार, निपुण
२०. साप
२१. गाढव
२२. जिवंत
२४. घरातील मोठी माणसे
२६. मोठी बहीण
२७. शेंगेवरील आवरण, फोलपट
२९. खुंटी, मेख
३०. पंख
३२. उत्तराधिकारी
३३. जन्म-मृत्यू
३५. फोडातील द्रव
३७. मधली बहीण
३८. रुचीहीन, बेचव
४०. उथळ मोठी वाटी
४१. राजवाडा
४२. प्रत्युत्तर
४३. इक्षुदंड, यापासून साखर बनवितात
४४. शूर
४५. खण पण कापड नव्हे
४६. श्रेष्ठ पुरुष
४९. कजाग स्त्री, आदिमाया
५१. सोन्याचे शिवकालीन नाणे
५३. हात
५५. तिरळा, काणा
५६अ. सत्त्व
५७. प्रताप, विक्रम
५९. प्रेत
६१. कलावंत
६३. मोठी जाड सतरंजी
६४. झाड
६५. चटकन रागावणारा
६६. काळ्या पाठीचे हरिण
६९. मुंबईतील एक उपनगर
७२. व्यवस्था, उद्योग
७३. समानता
७४. पेन-पन्सिलीची पेटी
७७. परिस्थिती
७८. झाडाची त्वचा
७९. पुरणाची आमटी, कोल्हापुरी मिसळीतील रस्सा
८०. पाटलाचे काम

## उभे शब्द

२. पूर्ण बहिरा
३. चुकीचे (हिंदी)
४. क्षमा, दुर्लक्ष
५. चीर, फट
६. नवऱ्याचा भाऊ
७. मित्र, सोबती
९. एकूणात प्रमाण
१०. किंमत
११. पाचवीला पुजली जाणारी
१३. कापड विणण्याचे साधन
१५. पशू
१७. आकाश
१९. मूळ आधार
२१. कृष्णसखी
२२. मिठाई तयार करणारा
२३. तपासणी करणारा
२५. बारीकसारीक
२६. तारणारा
२८. काढलेली सुट्टी
३०. अत्युच्च लष्करी बहुमान
३१. पांढरे केस लपवणारा
३४. अभिनेता
३६. खुंट, आंचळ
३७. संमोहित करणारे सौंदर्य
३९. मदतनीस
४७. मोजकेपणा, मितता
४८. सरस्वतीच्या जवळील वाद्य
४९. भ्रमर, भुंगा
५०. माणुसकी
५२. नकला करणारा
५४. धपाटा
५६. न्यूनता
५६ब. प्रभात
५८. सज्जनगडचे संत
६०. मऊ पदार्थाचा आघात
६२. दही घुसळण्याचे साधन
६६. फळावरील साल
६८. रायगडावरील एक कडा
७०. धमकी
७१. पवित्र, शुद्ध
७४. मनाचा ओढा
७५. घट्ट, धन
७६. शिल्लक राहिलेली रक्कम

## आडवे उत्तरे

१.दाब ३.गगनभेदी ८.वास १०.भास १२.हिमालय १४.गरजवंत १६.रानवट १८.पारंगत २०.नाग २१.रासभ २२.हयात २४.वडीलधारी २६.ताई २७.टरफल २९.पाचर ३०.पर ३२.वारस ३३.जननमरण ३५.लस ३७.माई ३८.नीरस ४०.सट ४१.महाल ४२.पडसाद ४३.ऊस ४४.वीर ४५.कप्पा ४६.नरवर ४९.महामाता ५१.होन ५३.कर ५५.चकणा ५६अ.कस ५७.पराक्रम ५९.कलेवर ६१.कलाकार ६३.जाजम ६४.तरु ६५.तापट ६७.काळवीट ६९.दादर ७२.कारभार ७३.समता ७४.कलमदान ७७.हालहवाल ७८.साल ७९.कट ८०.पाटीलकी

## उभे उत्तरे

२.बहिरभट ३.गलत ४.गय ५.भेग ६.दीर ७.सवंगडी ९.सरासरी १०.भाव ११.सटवाई १३.माग १५.जनावर १७.नभ १९.पाया २१.राधा २२.हलवाई २३.तपासनीस २५.लहानसहान २६.तारणहार २८.रजा ३०.परमवीरचक्र ३१.कलप ३४.नट ३६.सड ३७.मदकता ३९.सहायक ४७.रजपज ४८.वीणा ४९.मधुकर ५०.मानवता ५२.नकलाकार ५४.रट्टा ५६.कमतरता ५६ब.सकाळ ५८.रामदास ६०.रपका ६२.रवी ६६.टरफल ६८.टकमक ७०.दमदाटी ७१.मंगल ७४.कल ७५.दाट ७६.बाकी



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### टीम इंडियाच्या संघटनेला आरटीआय कायदा लागू नाही

**नवी दिल्ली** –जगातील सर्वात श्रीमंत क्रिकेट संघटना असलेल्या बीसीसीआय ला आता देशातील आरटीआय कायदा लागू राहणार नाही, बीसीसीआय आरटीआयच्या कक्षेबाहेर राहणार आहे, असा निर्णय केंद्रीय माहिती आयोगाने (उखउ) घेतला आहे. त्यामुळे, इउउख ला ठढख कायदा २००५ (ठढख) अंतर्गत झ्रीलश्र्ळल अीींहेीळीूं मानण्यास नकार देण्यात आला. इउउख ही तमिळनाडू सोसायटी नोंदणी कायद्यानुसार नोंदणीकृत स्वतंत्र संस्था असल्याचे निरीक्षण केंद्रीय माहिती आयोगाने मान्य करत भारतीय क्रिकेट नियामक मंडळाला आरटीआच्या कक्षेतून बाहेर ठेवलं आहे.
भारतीय क्रिकेट संघावर ज्या संघटनेनं नियंत्रण आहे, ती भारतातील सर्वात मोठी क्रिकेट संघटना म्हणजेच बीसीसीआय. बीसीसीआयमार्फत भारतीय क्रिकेट संघाचे सर्व दौरे नियोजित केले जातात.

### सिनरने केली जोकोविचच्या विक्रमाशी बरोबरी

दिल्ली–जॅनिक सिनरने इटालियन ओपन २०२६ चे विजेतेपद पटकावून इतिहास रचला. रोमच्या प्रतिष्ठित फोरो इटालिको येथे झालेल्या अंतिम सामन्यात, जागतिक क्रमवारीत अव्वल असलेल्या सिनरने नॉर्वेच्या कॅस्पर रुडला ६–४, ६–४ अशा सरळ सेट्समध्ये पराभूत केले. या विजयासह, सिनर ५० वर्षात इटालियन ओपन जिंकणारा पहिला इटालियन पुरुष टेनसपटू ठरला. यापूर्वीचे विजेतेपद १९७६ मध्ये एड्रियानो पानाटा यांच्या नावावर होते. सिनरचा विजय केवळ देशांतर्गत विजेतेपदापुरता मर्यादित नव्हता. त्याने टेनिसच्या इतिहासात आणखी एक मोठा टप्पा गाठला आहे. तो आता नोव्हाक जोकोविचनंतर, सर्व नऊ एटीपी मास्टर्स १००० स्पर्धा जिंकणारा दुसरा टेनिसपटू ठरला आहे. जोकोविचने २०१८ मध्ये हा पराक्रम केला होता, तर २४ वर्षीय सिनरने तरुण वयातच या विक्रमाची बरोबरी केली आहे.सिनर उत्कृष्ट फॉर्ममध्ये आहे. त्याने आपला सलग २९ वा सामना जिंकूला.

### भारतीय वंशाच्या गोल्फपटूने पीजीए चॅम्पियनशिप जिंकून रचला इतिहास

दिल्ली–भारतीय वंशाच्या इंग्लिश गोल्फर ॲरॉन रायने रविवारी पीजीए चॅम्पियनशिप जिंकून आपल्या कारकिर्दीतील सर्वात मोठा टप्पा गाठला. ३१ वर्षीय रायनं अंतिम फेरीत शानदार ६५ गुणांची नोंद करत ९–अंडर–पार एकूण स्कोअरसह स्पर्धा पूर्ण केली. त्यानं जॉन रहम आणि ॲलेक्स स्मॉली यांना तीन शॉट्सनी मागं टाकत इतिहास रचला. तो १०७ वर्षात पीजीए चॅम्पियनशिप जिंकणारा पहिला इंग्लिश खेळाडू ठरला, जो १९१९ मध्ये जिम बार्न्स यांच्यानंतरचा पहिलाच खेळाडू आहे. कसा मिळवला विजय : रायचा विजय केवळ एका ट्रॉफीपुरता मर्यादित नव्हता; ती संघर्ष, शिस्त आणि चिकाटीची कहाणी बनली. अंतिम फेरीत, त्यानं बॅक नाईनवर चार बर्डीज मारल्या, पण खरी जादू १७ व्या होलवर घडली, जिथं त्यानं ६८–फूटचा बर्डी पट थेट होलमध्ये मारला.

### धोनीला पुन्हा दुखापत!

मुंबई–चेन्नई सुपरकिंग्सचा माजी कर्णधार आणि दिग्गज क्रिकेटर असलेला एम एस धोनी याची आयपीएल सामन्यात एक झलक पाहण्यासाठी लाखो चाहते उत्सुक आहेत. मागच्या दोन दिवसात समोर आलेल्या माहितीनुसार धोनी हा १८ मे रोजी सोमवारी सनरायजर्स हैदराबाद विरुद्ध चेन्नई सुपरकिंग्स यांच्यात चेपॉक स्टेडियमवर होणारा सामना खेळू शकतो अशी शक्यता होती. सोमवारी चेन्नईतून समोर आलेल्या मीडिया रिपोर्ट्सनुसार एम्स धोनीला पुन्हा एकदा दुखापत झाली आहे. ज्यामुळे तो सनरायजर्स हैदराबाद विरुद्ध सामन्यात खेळताना दिसणार नाही. धोनीला नेमकं काय झालंय?
चेपॉक स्टेडियमवर सोमवारी १८ मे रोजी सनरायजर्स हैदराबाद विरुद्ध चेन्नई सुपरकिंग्स यांच्यात सामना खेळवला जाणार आहे. या सामन्यात धोनी प्लेईंग ११ किंवा इम्पॅक्ट प्लेअर म्हणून खेळणार अशी शक्यता वर्तवली जात होती.

## विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या भारतातील प्रक्षेपणाचा तिढा कायम



पुढील महिन्यात सुरू होणार्या विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या भारतातील प्रक्षेपणाचा तिढा अद्याप कायम आहे. तो सोडविण्यासाठी 'फिफा'चे माध्यम हक्क अधिकारी भारताच्या दौर्यावर आल्याचे तीन सूत्रांनी 'रॉयटर्स'ला सांगितले. भारतातील फुटबॉलप्रेमींना यंदाचा विश्वचषक पाहता येणार की नाही, याबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. प्रसारण हक्कांच्या किमतीवरून 'फिफा' आणि भारतीय मीडिया कंपन्यांमध्ये तोडगा निघालेला नाही. गेल्या आठवड्यात चीनमध्येही अशीच परिस्थिती होती. मात्र, चीन मीडिया ग्रुपने करार करून तिथला तिढा सोडवला.
'फिफा'च्या योजनांची माहिती असलेल्या तीन सूत्रांनी सांगितले की, ''फिफाचे माध्यम हक्क अधिकारी भारतात विविध भागधारकांशी चर्चा करत आहेत. मात्र, ते कोणाला भेटत आहेत आणि नेमका त्यांचा दौरा कशासाठी आहे, याचा तपशील स्पष्ट झालेला नाही.'' ''जगातील १८० हून अधिक प्रदेशांमध्ये प्रसारण करार पूर्ण झाले आहेत. भारतातही चर्चा सुरू असून त्या सध्या गोपनीय ठेवण्यात आल्या आहेत,'' असे 'फिफा'ने वृत्तसंस्थेला सांगितले.

### 'फिफा'चे माध्यम हक्क अधिकारी भारतात

या पार्श्वभूमीवर तोडगा काढण्यासाठी मफिफाफ्चे माध्यम हक्क अधिकारी भारतात दाखल झाले आहेत. ११ जूनपासून सुरू होणाऱ्या या स्पर्धेच्या प्रक्षेपणाबाबत भारतीय फुटबॉलप्रेमींमध्ये सध्या अनिश्चितता निर्माण झाली आहे.पुढील महिन्यात सुरू होणाऱ्या विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या भारतातील प्रक्षेपणाचा तिढा सोडवण्यासाठी 'फिफा'चे माध्यम हक्क अधिकारी भारतात दाखल झाले आहेत.

भारतातील सर्वांत मोठी मीडिया कंपनी रिलायन्स–डिस्ने आणि 'फिफा' यांच्यातील चर्चा निष्फळ ठरली आहे. सोनी या आणखी एका मोठ्या कंपनीने बोली लावण्यापासून माघार घेतली आहे, अशी माहिती मिळते आहे. रिलायन्स–डिस्नेने 'फिफा'च्या प्रक्षेपण हक्कांसाठी दोन कोटी डॉलर देण्याची तयारी दर्शवली होती. परंतु 'फिफा'ने सुरुवातीला १० कोटी डॉलरची मागणी केली, ज्यामुळे मतभेद निर्माण झाले. 'फिफा'ने अखेरीस किमान सहा कोटी डॉलरच्या आसपासची मागणी केल्याचे समजते.
'फिफा'ची रिलायन्स–डिस्नेबरोबर बैठक होत आहे की नाही, हे स्पष्ट झालेले नाही. अब्जाधीश मुकेश अंबानी यांच्या रिलायन्सच्या नेतृत्वाखालील या उपक्रमाने यावर भाष्य करण्यास नकार दिला आहे. विश्वचषक ११ जून रोजी सुरू होणार आहे, त्यामुळे कराराला अंतिम स्वरूप देण्यासह प्रसारणाच्या पायाभूत सुविधा उभारण्यासाठी आणि जाहिरातींची विक्री करण्यासाठी फक्त

### हैदराबाद-गुजरात प्लेऑफमध्ये!

## सनरायझर्स हैदराबादने चेन्नई सुपर किंग्सचा दणदणीत पराभव



**चेपॉक**:सनरायझर्स हैदराबादने चेन्नई सुपर किंग्सचा पराभव करत त्यांना स्पर्धेतून बाहेर केलं आहे. चेपॉकच्या मैदानावर झालेल्या सामन्यात हैदराबादने ५ विकेट्सने विजय मिळवला. चेन्नईवरील या विजयासह सनरायझर्स हैदराबाद व गुजरात टायटन्सचे संघ प्लेऑफसाठी पात्र ठरले आहेत. इशान किशनची अर्धशतकी खेळी हैदराबादसाठी मॅचविनिंग इनिंग ठरली. चेन्नईच्या गोलंदाजांनी सुरूवातीपासूनच चांगली गोलंदाजी करत सामन्यावर आपली पकड मजबूत ठेवली होती. पण अखेरच्या षटकांमध्ये इशान व सलिल अरोराने षटकार–चौकार लगावत संघाचा विजय निश्चित केला.
चेन्नईने दिलेल्या १८१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना हैदराबादची पॉवरप्लेची सुरूवात फारशी चांगली झाली नाही. ट्रॅव्हिस हेड ६ धावांवर बाद झाला. यानंतर अभिषेक व इशानने संघाचा डाव सावरला. अभिषेक २६ धावा करत बाद झाला. तर हेनरिक क्लासेनने २६ चेंडूत ६ चौकार व २ षटकारांसह ४७ धावांची खेळी करत बाद झाला, संजू सॅमसनने कमालीची स्टंपिंग करत त्याला बाद केलं. पण इशान किशनने मात्र हैदराबादच्या विजयाची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली. इशानने ४७ चेंडूत ७ चौकार व ३ षटकारांसह ७० धावांची खेळी केली.
इशानच्या मॅचविनिंग खेळीसह नितीश रेड्डीने ११ धावा व सलिल अरोरा १० धावा यांनी योगदान दिलं. यासह चेन्नईने १९ षटकांत ५ विकेट्स गमावत १८१ धावा करत विजय मिळवला आणि विजयासह प्लेऑफ गाठलं. चेन्नईकडून मुकेश चौधरीने २ विकेट्स घेतल्या. तर अंशुल कंबोज, नूर अहमद, अकील हुसैन यांनी १–१ विकेट्स घेतल्या.
चेन्नई सुपर किंग्सने सामन्याची नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला होता. चेपॉकच्या मैदानावरील खेळपट्टीवर चेन्नईच्या सर्व फलंदाजांनी धावा केल्या. संजू सॅमसन १३ चेंडूत २७ धावा करत बाद झाला. ऋतुराजने २१ चेंडूत १५ धावांची संथ खेळी केली, ज्यामुळे संघाच्या धावांवर याचा परिणाम झाला. यानंतर उर्विल पटेलने १३ धावा केल्या. यानंतर कार्तिक शर्माने ३२ धावांची खेळी केली. यानंतर डेवाल्ड ब्रेविस व शिवम दुबेच्या जोडीने ३८ चेंडूत महत्त्वपूर्ण ५९ धावांची भागीदारी रचली.
डेवाल्ड ब्रेविसने २७ चेंडूत २ चौकार व ४ षटकारांसह ४४ धावांची खेळी केली. तर शिवम दुबेने २६ धावाचं तर प्रशांत वीरने ११ धावांचं योगदान दिलं. यासह चेन्नईने २० षटकांत ७ बाद १८० धावा केल्या. हैदराबादकडून कर्णधार पॅट कमिन्सने सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या. तर साकिब हुसैनने २, इशान मलिंगा व प्रफुल्ल हिंगे यांनी १–१ विकेट्स घेतल्या.

## जॅनिक ठरला इटालियन ओपनचा विजेता

केली नोव्हाक जोकोविचच्या विक्रमाशी बरोबरी
जॅनिक सिनर ठरला करिअर गोल्डन मास्टर्स पूर्ण करणारा जगातील दुसरा टेनिसपटू



जॅनिक सिनरने इटालियन ओपन २०२६ चे विजेतेपद पटकावून इतिहास रचला. रोमच्या प्रतिष्ठित फोरो इटालिको येथे झालेल्या अंतिम सामन्यात, जागतिक क्रमवारीत अव्वल असलेल्या सिनरने नॉर्वेच्या कॅस्पर रुडला ६–४, ६–४ अशा सरळ सेट्समध्ये पराभूत केले. या विजयासह, सिनर ५० वर्षांत इटालियन ओपन जिंकणारा पहिला इटालियन पुरुष टेनसपटू ठरला. यापूर्वीचे विजेतेपद १९७६ मध्ये एड्रियानो पानाटा यांच्या नावावर होते. सिनरचा विजय (खीरश्र्ळरप जशिप २०२६ गरपपळज्ञ डळपपशी) केवळ देशांतर्गत विजेतेपदापुरता मर्यादित नव्हता. त्याने टेनिसच्या इतिहासात आणखी एक मोठा टप्पा गाठला आहे. तो आता नोव्हाक जोकोविचनंतर, सर्व नऊ एटीपी मास्टर्स १००० स्पर्धा जिंकणारा दुसरा टेनिसपटू ठरला आहे. जोकोविचने २०१८ मध्ये हा पराक्रम केला होता, तर २४ वर्षीय सिनरने तरुण वयातच या विक्रमाची बरोबरी केली आहे.
कान्सच्या रेड कार्पेटवर झळकली मराठी संस्कृती; अशोक आणि निवेदिता सराफ यांचा खास लूक!
फ्रान्स : जगभरात सध्या ७९ व्या 'कान्स फिल्म फेस्टिवल २०२६'ची जोरदार चर्चा रंगली आहे. बॉलिवूड आणि हॉलिवूड कलाकारांसोबत यंदा मराठी कलाकारांनीही ...
सिनर (खीरश्र्ळरप जशिप २०२६ गरपपळज्ञ डळपपशी) उत्कृष्ट फॉर्ममध्ये आहे. त्याने आपला सलग २९ वा सामना जिंकून, यावर्षी क्ले–कोर्टवरील आपला विक्रम १७–० असा केला आहे. त्याचा शेवटचा पराभव फेब्रुवारीमध्ये कतार ओपनमध्ये झाला होता. आता सर्वांचे लक्ष पुढच्या आठवड्यात सुरू होणाऱ्या फ्रेंच ओपनवर आहे, जिथे सिनरला विजेतेपदाचा प्रमुख दावेदार मानले जात आहे. रोलँड गॅरोस हे एकमेव ग्रँडस्लॅम आहे जे त्याला अजून जिंकायचे आहे.
अंतिम सामन्यादरम्यान, रोमचे सेंट्रल कोर्ट पूर्णपणे सिनरच्या (खीरश्र्ळरप जशिप २०२६ गरपपळज्ञ डळपपशी) उत्साहाने भारले होते. सिनरचा सिग्नेचर रंग असलेल्या केशरी रंगाचे कपडे घालून मोठ्या संख्येने चाहते आले होते. संपूर्ण सामन्यादरम्यान स्टेडियममध्ये सिनर, सिनर च्या घोषणा घुमत होत्या. इटलीचे राष्ट्राध्यक्ष सर्जिओ मॅटारेला हे देखील सामना पाहण्यासाठी उपस्थित होते. विजेतेपद जिंकल्यानंतर सिनर म्हणाला, ५० वर्षांनंतर ही ट्रॉफी इटलीमध्ये परत आली आहे. हा माझ्यासाठी आणि संपूर्ण देशासाठी एक खूप खास क्षण आहे. दोन वेळा फ्रेंच ओपनचा अंतिम सामना खेळलेल्या रुडने सामन्याची चांगली सुरुवात केली.

### धोनीचा शेवटचा सामना पावसामुळे रद्द होणार?

मुंबई–आयपीएल २०२६ स्पर्धेत आज होणाऱ्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्स आणि सनरायझर्स हैदराबाद हे दोन्ही संघ आमनेसामने येणार आहेत. हा सामना दोन कारणांसाठी खास ठरणार आहे. हा सामना प्लेऑफमध्ये जाण्याच्या दृष्टीने चेन्नईसाठी अतिशय महत्वाचा असणार आहे. तसेच चेन्नईचा हा या हंगामातील चेपॉकच्या मैदानावर होणारा शेवटचा सामना आहे.

## विराट कोहलीच्या नवव्यांदा ५०० धावा पूर्ण

धरमशाला : रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू आणि पंजाब किंग्ज यांच्यात सुरू असलेल्या सामन्यामध्ये विराट कोहली याने तगड्या विक्रमाची नोंद केली. या सामन्यात किंग विराट कोहलीने ५८ धावांची अर्धशतकी खेळी करत ५०० धावांचा आकडा पार केला. विराटने ऑस्ट्रेलियाचा खेळाडू डेव्हिड वॉर्नर याला मागे टाकले. विराट कोहलीने ३१ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले, यामध्ये ३ चौकार आणि ३ षटकारांचा समावेश होता. मागील सामन्यात विराट कोहलीने शतकी खेळी केली होती. या सामन्यातील ५८ धावांच्या खेळीसह त्याने ५२४ धावा केल्या आहेत.
विराट कोहलीने २०११ साली पहिल्यांदा आयपीएलमध्ये ५०० धावा पूर्ण केल्या आणि ५५७ धावा केल्या. त्यानंतर २०१३ मध्ये ६३४, २०१५ मध्ये ५०५ धावा केल्या. पण २०१६ चा हंगाम अविस्मरणीय ठरला, त्याने ४ शतकांसह ऐतिहासिक ९७३ धावा केल्या. त्याने २०१८ मध्येही ५००+ धावांचा टप्पा गाठला आणि नंतर सलग २०२३ मध्ये ६३९ धावा आणि २०२४ मध्ये ७४१ धावा करत पुन्हा ५०० पेक्षा जास्त धावा केल्या होत्या. नवव्यांदा कोहलीने आयपीएलध्ये ५०० पेक्षा अधिक धावा केल्या आहेत.विराट कोहलीने पंजाब किंग्स विरुद्धचे सर्व ३७ टी २० सामने फक्त आयपीएलमध्येच खेळले आहेत. त्यामुळे तो आयपीएल इतिहासात एकाच फ्रँचायझीविरुद्ध १२०० धावा करणारा पहिला फलंदाज बनला आहे आणि त्याने आपली बादशाहत आणखी मजबूत केली आहे. पंजाबविरुद्ध त्याचा सर्वोच्च वैयक्तिक स्कोअर नाबाद ११३ धावा आहे. कोहलीनंतर या यादीत इतर फलंदाजांची नावे येतात, पण किंग कोहलीच्या सातत्यापुढे सगळेच मागे पडले.

## चेन्नई सुपर किंग्स नंबर वन, तर मुंबई अन् आरसीबी दुसऱ्या क्रमांकावर

मुंबई–आयपीएल २०२६ चे ६२ सामने पूर्ण झाले असून आता लीग टप्प्यातील फक्त ८ सामने बाकी आहेत. रविवारी, १७ मे रोजी प्लेऑफमध्ये पोहोचणारा पहिला संघ निश्चित झाला. रॉयल चॅलेंजर्स बंगळूरने ११व्यांदा आयपीएल प्लेऑफमध्ये धडक मारली आहे. आयपीएल इतिहासात सर्वाधिक वेळा प्लेऑफमध्ये पोहोचणाऱ्या संघांमध्ये पाच वेळचा विजेता चेन्नई सुपर किंग्स अव्वल स्थानावर आहे.
तर मुंबई इंडियन्सनेही पाच वेळा किताब जिंकत ११ वेळा प्लेऑफमध्ये प्रवेश केला आहे. त्यामुळे मुंबई इंडियन्स आणि आरसीबी संयुक्तपणे दुसऱ्या स्थानावर आहेत. तीन वेळचा विजेता कोलकाता नाइट रायडर्स देखील टॉप–५ मध्ये आहे. तर सनरायझर्स हैदराबाद या यादीत पाचव्या स्थानावर आहे. आयपीएल प्लेऑफमध्ये सर्वाधिक वेळा पोहोचलेले संघ–

१२ वेळा – चेन्नई सुपर किंग्स
११ वेळा – मुंबई इंडियन्स
११ वेळा – रॉयल चॅलेंजर्स बंगळूर
८ वेळा – कोलकाता नाइट रायडर्स
७ वेळा – सनरायझर्स हैदराबाद
६ वेळा – दिल्ली कॅपिटल्स
६ वेळा – राजस्थान रॉयल्स
३ वेळा – पंजाब किंग्स
३ वेळा – गुजरात टायटन्स
२ वेळा – लखनऊ सुपर जायंट्स

उरलेल्या ३ जागांसाठी ७ संघांमध्ये घमासान
आयपीएल २०२६ मध्ये आता उरलेल्या तीन प्लेऑफ जागांसाठी तब्बल सात संघांमध्ये चुरशीची लढत सुरू आहे. मुंबई इंडियन्स आणि लखनऊ सुपर जायंट्स हे संघ आधीच स्पर्धेबाहेर गेले आहेत. पंजाब किंग्सच्या आशा जवळपास संपल्या आहेत. दिल्लीने उरलेला सामना जिंकला तरी त्यांचे जास्तीत जास्त १४ गुण होतील. दुसरीकडे पंजाब किंग्सने लखनऊविरुद्धचा अखेरचा सामना जिंकला, तर ते १५ गुणांपर्यंत पोहोचतील.

## संजू-क्लासेनमध्ये मैदानावर राडा! सॅमसनचा जळता कटाक्ष अनब क्लासेन गेला अंगावर धावून

संजू सॅमसन आणि हेनरिक क्लासेन यांच्यात मैदानावर चांगलीच बाचाबाची झाली. ज्याचा व्हीडिओ सध्या व्हायरल होत आहे.
संजू सॅमसन हेनरिक क्लासेनमध्ये वाद (फोटो–द)
चेन्नई सुपर किंग्स व सनरायझर्स हैदराबाद यांच्यातील सामन्यात हेनरिक क्लासेन व संजू सॅमसन यांच्यात मैदानावरच वाद पाहायला मिळाला. संजू व क्लासेन दोघेही तसे शांत स्वभावाचे खेळाडू होते. पण या सामन्यात मात्र दोघेही चांगलेच संतापले होते. १५ व्या षटकात संजूने क्लासेनला कमालीच्या स्टंपिंगवर बाद केलं आणि त्यानंतर तिसऱ्या पंचांनी बाद दिल्यानंतर मैदानावर हा राडा झाला. ज्याचा व्हीडिओ सध्या व्हायरल होत आहे.
चेन्नई सुपर किंग्सने प्रथम फलंदाजी करताना १८० धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात हैदराबाद संघाची सुरूवात खराब झाली. हेड ४ धावा करत माघारी परतला. तर अभिषेक शर्मा २६ धावा करत बाद झाला. यानंतर मैदानावर आलेल्या क्लासेनने आपल्या कमालीच्या फॉर्मसह वादळी फटकेबाजी करायला सुरूवात केली. स्पेन्सर जॉन्सनने क्लासेनचा झेल सोडल्याने त्याला जीवदान मिळालं. क्लासेन ४७ धावांवर खेळत असताना नूर अहमदच्या षटकात संजूने त्याला स्टंपिंग करत बाद केलं.
संजू–क्लासेनमध्ये कशावरून झाला वाद?
सॅमसन आणि क्लासेन यांच्यातील वाद १५ व्या षटकात झाला. क्लासेनने तिसऱ्या चेंडूवर नूर अहमदच्या गुगलीवर मोठा फटका मारण्याचा प्रयत्न केला, पण तो चुकला. क्लासेनचा पाय वर उचलला गेला आणि संजू सॅमसनने अवघ्या काही क्षणात त्याला स्टंपिंग करत बाद केलं. आपण नाबाद आहोत असं क्लासेनला वाटलं, पण तिसऱ्या पंचांनी त्याला बाद घोषित केलं.
ङ्गमला त्याच्यासाठी हा सामना जिंकायचा होताःङ्क, इशान किशन सामनावीर पुरस्कारानंतर रडला, सांगितलं कोणासाठी साकारली मॅचविनिंग खेळी
त्यानंतर संजू सॅमसनला नूर अहमदने मिठी मारलेली असताना संजू क्लासेनकडे जळता कटाक्ष टाकत पाहत होता. तितक्यात त्याच्याजवळून जाणारा क्लासेन त्याला काहीतरी बोलताना दिसला. त्या दोन खेळाडूंमध्ये वाद सुरू झाला. खेळाडूंनी मध्यस्थी केली आणि क्लासेन पॅव्हेलियनकडे परत जाऊ लागला. मात्र, क्लासेन मागे वळून संजूला सातत्याने काहीतरी बोलताना दिसला.
क्लासेन पॅव्हेलियनमध्ये गेल्यानंतर मैदानावरील पंच संजूशी बोलत होते, तेव्हा संजू त्यांच्यावरही संतापलेला दिसला. नेहमी शांत स्वभावाचा संजू क्लासेनबरोबरच्या लढाईदरम्यान चांगलाच संतापला होता. कठीण खेळपट्टीवर क्लासेनने १८०.७७ च्या स्ट्राईक रेटने फलंदाजी केली आणि इशान किशनसोबत एक भक्कम भागीदारी रचली. क्लासेन आणि किशनने ४१ चेंडूंमध्ये तिसऱ्या विकेटसाठी ७५ धावा जोडल्या. या भागीदारीने सामन्याचे चित्र पालटलं. सनरायझर्स हैदराबादने १९ षटकांत १८१ धावांचे लक्ष्य गाठत ५ गडी राखून सामना जिंकला.



# उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणूक जाहीर; १८ जून रोजी मतदान, तर २२ जूनला होणार मतमोजणी

**धाराशिव/लातूर/प्रतिनिधी:** : भारत निवडणूक आयोगाने विधानपरिषदेच्या उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ द्विवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला आहे. त्यानुसार २५ मे २०२६ रोजी निवडणुकीची अधिसूचना प्रसिद्ध केली जाईल. या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १ जून २०२६ पर्यंत असून उमेदवारी अर्जांची छाननी २ जून २०२६ रोजी केली जाईल, तसेच उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख ४ जून २०२६ अशी निश्चित करण्यात आली आहे.

यानंतर गुरुवार, १८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया पार पडणार असून सोमवार, २२ जून २०२६ रोजी मतमोजणी केली जाईल आणि संपूर्ण निवडणूक प्रक्रिया २५ जून २०२६ पर्यंत पूर्ण केली जाईल.

निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी लातूर तथा धाराशिव यांनी या निवडणूक कार्यक्रमाची माहिती दिली असून केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार संपूर्ण मतदारसंघात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली असल्याचे त्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

# कष्टातून उभारलेल्या व्यवसायाला यशाची साथ मिळतेच – डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर



**लातूर/प्रतिनिधी:** कोणताही व्यवसाय करताना प्रामाणिक प्रयत्न व ग्राहकांचे हित जोपासणे आवश्यक असते. ग्राहकांचा विश्वास संपादन केल्यास कष्टातून उभारलेला व्यवसाय यशस्वी होतोच असे मत भाजपाच्या प्रदेश उपाध्याक्षा डॉ. अर्चनाताई पाटील चाकुरकर यांनी व्यक्त केले.

लातूर शहरातील नारायण नगर येथे नव्याने सुरू झालेल्या अन्नपूर्णा तेल उद्योग चा शुभारंभ भाजपाच्या प्रदेश उपाध्याक्षा डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या हस्ते रविवार (दि. १७) रोजी संपन्न झाला यावेळी डॉ. चाकुरकर बोलत होत्या. प्रमुख पाहुणे म्हणुन उद्योजक शेखर पत्रावळे यांची उपस्थिती होती.

सौ. सुचिता व भीमाशंकर शिंगाडे यांनी अन्नपूर्णा तेल उद्योग उभारला आहे. या उपक्रमातून विविध तेलबियांपासून शुद्ध तेल गाळप करुन देण्यात येणार आहे. यामुळे ग्राहकांना या उपक्रमाचा मोठ्या प्रमाणात लाभ होईल असे मत शेखर पत्रावळे यांनी यावेळी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. अर्चनाताई पाटील चाकुरकर यांच्या हस्ते फित कापून अन्नपूर्णा तेल उद्योगाचा शुभारंभ करण्यात आला. अन्नपूर्णा च्या संचालिका सौ सुचिता व भीमाशंकर शिंगाडे या दांपत्यास व्यवसायाच्या यशस्वी वाटचालीसाठी डॉ. अर्चनाताई पाटील चाकुरकर, प्रमुख पाहुणे शेखर पत्रावळे यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.

# महात्मा बसवेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये कॅम्पस ड्राईव्हद्वारे २० विद्यार्थ्यांना नोकरी व इंटर्नशिपसाठी निवड




**लातूर/प्रतिनिधी:** महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी, बार्शी रोड, लातूर येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील डी.फार्मसी व बी.फार्मसी विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. या कॅम्पस ड्राईव्हमध्ये -सळे झहरीरलशींळलरश्री डींव. आणि चरीज्ञीरपी झहरीर डींव. या नामांकित कंपन्याच्या माध्यमातून एकूण २० विद्यार्थ्यांना नोकरी व इंटर्नशिपसाठी निवड करण्यात आली आहे.

याप्रसंगी मानव संसाधन अधिकारी नितीन कदम, संतोष स्वामी, गणेश कांबळे, संस्थेचे कार्यकारी संचालक प्रदीप दिंडेगावे, महाविद्यालयचे प्राचार्य डॉ.सतीश मुदगडे आणि सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते. कॅम्पस ड्राईव्हसाठी ५० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. या कॅम्पस ड्राईव्हमुळे विद्यार्थ्यांना नामांकित औषधनिर्माण कंपन्यांमध्ये उज्ज्वल करिअर घडविण्याची संधी उपलब्ध झाली असून महाविद्यालयाच्या शैक्षणिक व प्रशिक्षण गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे.

यावेळी संस्थेचे कार्यकारी संचालक प्रदीप दिंडेगावे यांनी विद्यार्थ्यांना फार्मसी क्षेत्रातील करिअरच्या विविध संधींबाबत मार्गदर्शन करताना उद्योग क्षेत्रातील वाढत्या संधींचे महत्त्व समजावून सांगितले. महाविद्यालयात आयोजित अशा कॅम्पस ड्राईव्हमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत होत असून, भविष्यातही विद्यार्थ्यांना रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी दरवर्षी अशा मुलाखतींचे आयोजन करण्यात येईल असे प्राचार्य डॉ. सतीश मुदगडे यांनी सांगितले.

त्यांनी मिळवेलेल्या या उज्ज्वल यशाबद्दल महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष माधवराव पाटील तपसेचिंचोलीकर, सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, सर्व संचालक मंडळातील पदाधिकारी, सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

यावेळी डी.फार्मासीचे प्रभारी संतोष कोसगी, प्रा.प्रदीप भारती, प्रा.निलेश शिंदे, प्रा.श्रीराम कासार, प्रा.अयाज पठाण, प्रा.देशमुख, प्रा.कुलकर्णी, प्रा.सोनाली कुठार आणि सर्व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.वैष्णवी इंडे यांनी केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## केशवराज मंदिरात पंच कुंडात्मक याग:पवमान स्वाहाकार महायज्ञाचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी** येथील श्री केशवराज मंदिरात दि. २१ ते दि. २३ मे २०२६ या कालावधीत पंच कुंडात्मक महाविष्णू याग व पवमान स्वाहाकार महायज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. हा धार्मिक विवधि श्रीक्षेत्र मोहटादेवीचे प्रधान आचार्य बबनदेव कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे. प्रत्येक तीन वर्षांनी येणाऱ्या अधिकमासाच्या निमित्ताने यावर्षीच्या अधिकमासामध्ये पूर्णवादाचार्य सद्गुरु श्री रामचंद्र महाराज पारनेरकर यांच्या शुभाशिर्वादाने व पूर्णवाद वर्धिष्णू विष्णू महाराज पारनेरकर यांच्या प्रेरणेने सदर धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यज्ञकाळात सामूहिक श्री विष्णू सहस्त्रनाम पठण , सामूहिक श्री सूक्त पठण व कुंकुमार्चन तसेच स्वर्णीनंद ग्रुपकडून गायनसेवा सादर होणार आहे. दररोज सायंकाळी आठ ते नऊ या वेळेत भजनसेवा होणार आहे. या पवित्र काळात श्री केशवराजच्या मूर्तीस तीन दिवस विष्णू सहस्त्रनामासह १ लाख तुलशी अर्पण केल्या जातात . या सोहळ्याचे मुख्य महाप्रसाद यजमान दीपक हरी कोटलवार हे आहेत. मुख्य तुलशी अर्चना यजमान पापशेठ ताथवडे परिवार, मुख्य यज्ञ यजमान धर्मवीर भारती , आयोजक केशवराज मंदिर हे आहेत. या धार्मिक सोहळ्याचा लाभ भाविक भक्तांनी घ्यावा,असे आवाहन केशवराज मंदिरचे विश्वस्त अध्यक्ष एड. संजय पांडे, उपाध्यक्ष बजरंगलाल रांदड, सचिव मधुकर पाठक , अशोक गोविंदपूरकर, पापासेठ ताथोडे , एड. कालिदास देशपांडे, मनोहर सावळे, मधुसूदन भुतडा, दामोदर भुतडा, राजाभाऊ पांडे, शाम कोटलवार , योगेश उन्हाळे, सुनील अयाचित, सुमुख गोविंदपूरकर यांनी केले आहे.

## पाणी साठवण्याच्या खड्ड्यात दोघे बुडाले

**लातूर/प्रतिनिधी :** खेळताना पाणी साठवण्याच्या खड्ड्यातपडून दोन मुलांचा दुर्दैवी मृत्यू झाला.लातूर शहरातील बोधेनगर परिसरात रविवारी दुपारी ही घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, बोधे नगरयेथील रामला इंडस्ट्रीजच्या पाठीमागीलभागात ही घटना घडली. दिव्या नवनाथउबाळे (६) व कार्तिक भरत कांबळे(७) अशी दोघा मृतांची नावे आहेत.दुपारी ते दोघे घराशेजारी खेळत होते.

रविवार सुटीचा दिवस असल्याने परिसरात दुपारी शुकशुकाट होता.दिव्या आणि कार्तिक दोघेघराबाहेर खेळत होते. खेळतानादोघे खड्ड्यात पडले. त्यामुळेलागलीच ही घटना कुणालासमजली नाही. बराचवेळहोऊनही दोघे घराजवळ दिसतनसल्याने कुटुंबियांनी त्यांचा शोधघेतला. त्यावेळी ते खड्ड्यातपडल्याचे आढळले. घटनेचीमाहिती मिळताच परिसरातीलनागरिकांनी तातडीने दोघांना बाहेरकाढून शासकीय रुग्णालयातदाखल केले. मात्र वैद्यकीयअधिकाऱ्यांनी तपासणीअंतीदोघांनाही मृत घोषित केले.कुटुंबियांनी आक्रोष केला. इनसाइड स्टोरी- टँकर व्यावसायिकास जागा भाडेतत्त्वावर दिली ज्या खड्ड्याने दोन मुलांचा बळीघेतला त्या जागेच्या मालकानेआपला प्लॉट टँकर व्यावसायिकाला भाडेतत्त्वावर दिला आहे. संबंधितव्यावसायिकाने प्लॉटमध्ये खड्डाखोदून त्यात ताडपत्री अंथरली आहे. याखड्ड्यात बोअरवेलचे पाणी साठवलेजात होते. खड्ड्यात पाणी होते. या पाण्याचा पुरवठावसतिगृहांसह इतर भागात केला जातहोता. या खड्ड्याला संरक्षक कुंपणनाही. तसेच रस्त्यालगत असलेला हा खड्डा वाहनांसाठी धोक्याचा आहे.

# लोकनेते विलासराव देशमुख क्रिकेट चॅम्पियनशिप २०२६ : ग्रामीण टी-१० स्पर्धेचे नवे पर्व ग्रामीण भागातील क्रिकेटपटूंना राज्यस्तरावर चमकण्याची सुवर्णसंधी

**लातूर/प्रतिनिधी :**

लातूर : ग्रामीण भागातील होतकरू क्रिकेटपटूंना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या लोकनेते विलासराव देशमुख क्रिकेट चॅम्पियनशिप २०२६ - ग्रामीण टी-१० स्पर्धा यंदा नव्या स्वरूपात रंगणार आहेत.मागील २०२२,२०२३ आणि २०२४ या तीन वर्षांत स्पर्धेला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादानंतर यंदाच्या स्पर्धेकडे जिल्ह्यातील क्रिकेटप्रेमींचे लक्ष लागले आहे.यावर्षी मुलांच्या संघा सोबतच मुलींचे संघ देखील सहभागी होणार आहेत.

दि. २० ते २५ मे २०२६ या कालावधीत दयानंद महाविद्यालय, लातूर येथील क्रिकेट मैदानावर मुलांचे आणि मुलींचे क्रिकेट सामने दुपारी तीन वाजता सामने सुरू होतील या. ग्रामीण भागातील गुणवंत खेळाडूंना राज्यस्तरावर पोहोचण्यासाठी सक्षम व्यासपीठ निर्माण व्हावे, हा या स्पर्धेमागील मुख्य उद्देश आहे.

मागील तीन वर्षांतील उत्कृष्ट कामगिरीच्या आधारे क्रीडा क्षेत्रातील तज्ज्ञांकडून तब्बल १८० गुणवंत खेळाडूंची निवड करण्यात आली असून, त्यांचे एकूण १२ संघ तयार करण्यात आले आहेत. प्रत्येक संघात १५ खेळाडूंचा समावेश आहे.

स्पर्धेत सहभागी होणारे संघ पुढीलप्रमाणे -

AUSA WORRIERS (औसा वॉरियर्स)
JALKOT TITANS (जळकोट टायटन्स)
CHAKUR CHARGERS (चाकूर चार्जर्स)
NILANGA KNIGHTS (निलंगा नाईट्स)
SHIRUR ANANTPAL STRYKERS (शिरूर अनंतपाळ स्ट्रायकर्स)
LATUR CITY KINGS (लातूर सिटी किंग्स)
LATUR LIONS (लातूर लायन्स)
DEONI DEARDEVILS (देवणी डेअरडेव्हिल्स)
UDGIR UNITED (उदगीर युनायटेड)
GRAMIN INDIANS (ग्रामीण इंडियन्स)
RENAPUR ROYALS (रेणापूर रॉयल्स)
AHEMADPUR ASSESSIANS (अहमदपूर असॅसिन्स)

स्पर्धेतील प्रथम व द्वितीय क्रमांकाच्या संघांना आकर्षक पारितोषिके देऊन गौरविण्यात येणार आहे. तसेच 'उत्कृष्ट फलंदाज', 'उत्कृष्ट गोलंदाज' आणि 'उत्कृष्ट क्षेत्ररक्षक' अशा वैयक्तिक पुरस्कारांनी खेळाडूंचा सन्मान करण्यात येणार आहे.

विशेष म्हणजे, संपूर्ण स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचा विशेष संघ तयार करण्यात येणार असून, या संघाला महाराष्ट्र स्तरावरील विविध क्रिकेट स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी ग्रामीण टी-१०च्या माध्यमातून पूर्ण सहकार्य करण्यात येणार आहे.




ग्रामीण भागातील युवकांमध्ये क्रीडा संस्कृती रुजविणे, त्यांना मोठ्या स्पर्धांचे व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि लपलेल्या गुणवत्तेला राज्यस्तरावर संधी मिळवून देणे, हा धिरज विलासराव देशमुख यांच्या या उपक्रमामागील प्रमुख हेतू असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले आहे.

# खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल युवकांसाठी 'अमृत' संस्थेतर्फे मोफत ड्रोन प्रशिक्षण

## प्रशिक्षणानंतर अधिकृत 'ड्रोन पायलट परवाना'ही मिळणार

**लातूर/प्रतिनिधी :** आजच्या आधुनिक काळात शेती, फोटोग्राफी, सर्वेक्षण, सुरक्षा यांसह अनेक तांत्रिक क्षेत्रांमध्ये ड्रोनचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जात आहे. सामान्यतः ड्रोन चालवण्याचे प्रशिक्षण घेण्यासाठी मोठा खर्च करावा लागतो. मात्र, महाराष्ट्र शासनाच्या 'अमृत' संस्थेमार्फत खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील युवकांना हे प्रशिक्षण पूर्णपणे मोफत दिले जात आहे. हे प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर उमेदवारांना अधिकृत 'ड्रोन पायलट परवाना' देखील दिला जाणार आहे.

महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) ही महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था असून, ती खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी विविध कौशल्य विकास आणि रोजगाराभिमुख प्रशिक्षण कार्यक्रम राबवते. याच अंतर्गत संस्थेने 'अमृत ड्रोन मिशन' हा उपक्रम हाती घेतला असून, त्याद्वारे हे ड्रोन ऑपरेटर प्रशिक्षण सुरू करण्यात आले आहे.

या प्रशिक्षणाचा लाभ राज्यातील अनेक युवक घेत असून, त्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात करिअर करण्याची मोठी संधी उपलब्ध होत आहे. विशेषतः ग्रामीण भागातील युवकांना रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी मिळाव्यात, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. या प्रशिक्षणाचा कालावधी १० दिवसांचा असून, यादरम्यान उमेदवारांच्या राहण्याची आणि जेवणाची संपूर्ण व्यवस्था 'अमृत' संस्थेमार्फत मोफत केली जाणार आहे, तसेच प्रशिक्षणासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही.

या योजनेचा लाभ खुल्या प्रवर्गातील अशा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना दिला जातो, ज्यांना इतर कोणत्याही शासकीय संस्था किंवा महामंडळांचा लाभ मिळत नाही. यामध्ये सद्यस्थितीत ब्राह्मण, कायस्थ, कोमटी/वैश्य, मारवाडी, पटेल, राजपूत, यलमार, अय्यंगार, राजपुरोहित, पाटीदार, नायर, नायडू, कम्मा, कानबी, सिंधी, बनिया, बंगाली, त्यागी, सेनगुनथर, गुजराथी, ठाकूर, जाट, लोहाना, हिंदू नेपाळी व भूमिहार अशा २५ जातींचा समावेश आहे.

या योजनेसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांपेक्षा कमी असणे आवश्यक असून, अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा. तसेच त्याचे वय १८ ते ५५ वर्षांच्या दरम्यान असावे आणि तो किमान १२ वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. या प्रशिक्षणात शेतकरी कुटुंबातील उमेदवारांना प्राधान्य दिले जाणार असून, अर्जासोबत वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील. इच्छुक आणि पात्र उमेदवारांनी अमृत संस्थेच्या जिल्हा कार्यालयाशी संपर्क साधावा किंवा ऑनलाइन अर्ज करावा, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक शुभम मुळजकर यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी उमेदवारांनी '१ ला मजला, पितृछाया बिल्डिंग, मयूरेश्वर अपार्टमेंट, सिग्नल कॅम्प, विद्यानगर, लातूर - ४१३५१२' या पत्त्यावर किंवा ७३९१०६५४७० या संपर्क क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# पिक विमा तात्काळ द्यावा अन्यथा रूमने घेऊन रस्त्यावर उतरू- शिवसेना




**निलंगा/मोईज सितारी:** निलंगा -तालुक्यातील ९० टक्के शेतकऱ्यांनी खरीप २०२५ चा विमा भरून जवळपास एक वर्ष झाले असतानाच सुद्धा आज तागायत पिक विमा मिळालाच नाही. सर्वच महसूल मंडळांना विमा मंजूर करावा अन्यथा शिवसेना शेतकरी सेनेच्या वतीने शेतकऱ्यांसोबत रूमने हातात घेऊन रस्त्यावर उतरण्याचा इशारा शिवसेना शेतकरी सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. अण्णासाहेब मिरगाळे यांनी निवेदनाद्वारे तालुका कृषी अधिकारी यांना दिला आहे.

खरीप २०२५ चा विमा निलंगा तालुक्यातील ९० टक्के लोकांनी व्याजी काढून पीकविमा भरलेला आहे. निलंगा तालुक्यातील सर्वच महसूल मंडळाला शासनाने तात्काळ पिक विमा मंजूर मंजूर करावा. पीकविमा भरून जवळपास दुसरा वर्ष उजाडत असून देखील आज तागायत शासनाने नुकसान भरपाईचे अनुदान देऊन सुद्धा विमा कंपनीने पंचनामे करून देखील आज तागायत शेतकऱ्यांना विमा कंपनीने एक रुपयाही विमा दिलेला नाही. अतिवृष्टीमुळे लाखो रुपयाचे सोयाबीनचे नुकसान झाल्यामुळे शासनाने अनुदान स्वरूपात शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिली असताना देखील विमा कंपनी पीकविमा न देण्याचे कारण काय हे समजायला तयार नाही. शासनाने तात्काळ विमा कंपनीला सांगून पिकविमा शेतकऱ्यांच्या खात्यात आठ दिवसाच्या आत पीकविमा जमा नाही केल्यास शेतकऱ्यासोबत रूमने हातात घेऊन रस्त्यावर उतरनार असा इशारा निवेदनाद्वारे शिवसेना शेतकरी सेनेचे जिल्हाप्रमुख प्रा. अण्णासाहेब पंचप्पा मिरगाळे यांनी दिला सोबत शिवसेना विधानसभा प्रमुख शिवाजी पांढरे, महिला आघाडी तालुकाप्रमुख सविता पांढरे, रंगराव म्हेत्रे, धनराज पाटील सुलेमान पटेल, सुनील धोंडदेव इत्यादी शेतकरी उपस्थित होते.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०१

# बाळासाहेब जाधव यांना 'महाराष्ट्र राज्य आदर्श पत्रकारिता पुरस्कार' जाहीर



**लातूर/प्रतिनिधी:** पत्रकारिता क्षेत्रातील निष्ठा, प्रामाणिकता आणि समाजाभिमुख कार्याची दखल घेत शिर्डी येथील धर्मवीर संभाजीराजे प्रतिष्ठान, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दिला जाणारा प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय 'महाराष्ट्र राज्य आदर्श पत्रकारिता पुरस्कार' यंदा लातूरचे ज्येष्ठ व अनुभवी पत्रकार बाळासाहेब जाधव यांना जाहीर करण्यात आला आहे. या संदर्भातील अधिकृत निवडपत्र संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रविंद्र गुंजाळ यांनी प्रदान केले आहे.

गेल्या दोन दशकांहून अधिक काळ बाळासाहेब जाधव यांनी पत्रकारिता क्षेत्रात सातत्यपूर्ण, अभ्यासू आणि धाडसी कार्य करत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. लोकमत, एकमत, लोकाशा, गावकरी यांसारख्या नामांकित दैनिकांमधून त्यांनी विविध सामाजिक, राजकीय आणि लोकजीवनाशी निगडित प्रश्नांवर प्रभावी लेखन करत समाजमनाला दिशा देण्याचे कार्य केले आहे. त्यांच्या लेखणीने नेहमीच सर्वसामान्यांच्या वेदना, समस्या आणि अपेक्षा यांना वाचा फोडत न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे.

सध्या ते भाजपा नेते तथा किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी, माजी आमदार शिवाजीराव पाटील कव्हेकर यांच्या 'जननायक' या वृत्तपत्रात कार्यकारी संपादक म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. या माध्यमातूनही त्यांनी जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देत निर्भीड व तथ्याधारित पत्रकारितेची परंपरा जोपासली आहे.

पत्रकारिता ही लोकशाहीचा चौथा स्तंभ मानली जाते आणि त्या स्तंभाला बळकट करण्यासाठी बाळासाहेब जाधव यांनी केलेले योगदान उल्लेखनीय व प्रेरणादायी आहे. त्यांच्या कार्यात समाजातील वंचित, दुर्लक्षित आणि पीडित घटकांच्या हक्कांसाठी सातत्याने आवाज उठवण्याची भूमिका ठळकपणे दिसून येते. त्यांच्या या सामाजिक बांधिलकीची आणि व्यावसायिक प्रामाणिकतेची दखल घेत हा सन्मान जाहीर करण्यात आला आहे. त्यांना हा पुरस्कार १७ मे २०२६ रोजी शिर्डी येथील कार्यक्रमात मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात येणार आहे.

## बोथी येथे नदी खोलीकरण व रुंदीकरण कामाचा शुभारंभ

# 'जलतारा' प्रकल्पासाठी गावकऱ्यांनी पुढाकार घ्यावा: सहकार मंत्री बाबासाहेब पाटील

**लातूर/प्रतिनिधी:** आपल्या गावात पडणारे पावसाचे पाणी आपल्याच गावात जिरविण्यासाठी प्रत्येक गावकऱ्याने जलतारा प्रकल्पासारखे उपक्रम राबविण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. यासारख्या जलसंधारणाच्या कामांमुळे भूजल पातळी वाढण्यास मोठी मदत होणार आहे, असे प्रतिपादन राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केले.

चाकूर तालुक्यातील बोथी येथे 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' अभियानांतर्गत नदी खोलीकरण व रुंदीकरण कामाचे उद्घाटन आणि 'जलतारा' प्रकल्पाच्या पाहणीप्रसंगी सहकार मंत्री श्री. पाटील बोलत होते. राज्य शासनाचा मृद व जलसंधारण विभाग, नाम फाऊंडेशन, टाटा मोटर्स फाऊंडेशन आणि सिद्धी शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज यांच्या संयुक्त विद्यमाने या जलसंधारण कामांचा शुभारंभ सहकार मंत्री श्री. पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, जिल्हा जलसंधारण अधिकारी जावेद पटेल, सिद्धी शुगरचे कार्यकारी संचालक अविनाश जाधव, जिल्हा परिषद सदस्य भानुदास पोटे, सरपंच बालाजी आवाळे, नाम फाऊंडेशनचे विलास चामे, टाटा मोटर्स फाऊंडेशनचे प्रमोद घायाळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

बोथी गावातील तीन पैकी एका नदीच्या खोलीकरणाचे काम गतवर्षीच पूर्ण झाले असून, आता दुसऱ्या नदीच्या २ किमी लांबीच्या खोलीकरण व रुंदीकरण कामाला सुरुवात झाली आहे. गावात एकूण १ हजार जलतारा खड्डे तयार करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. गावकऱ्यांनी आतापर्यंत ३९५ खड्डे पूर्ण केले असून, याबद्दल सहकार मंत्री श्री. पाटील यांनी गावकऱ्यांचे विशेष अभिनंदन केले व



उर्वरित काम तातडीने पूर्ण करण्याचे आवाहन केले. तसेच शेतकऱ्यांनी शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन खर्च कमी करण्यासाठी प्रयत्न करावा, असे त्यांनी सांगितले.

जलतारा प्रकल्पांतर्गत प्रत्येक शेतकऱ्याने आपल्या एका एकर शेतात ५ फूट बाय ५ फूट आकाराचा एक खड्डा खोदायचा आहे. यामुळे पावसाचे लाखो लीटर पाणी थेट जमिनीत मुरते आणि भूजल पातळी वाढून हेच पाणी पुन्हा विहिरींच्या माध्यमातून शेतकऱ्यांना उपलब्ध होते. यंदा एल निनोचे संकट येण्याची शक्यता असल्याने पाणी टंचाई भासू शकते. अशा परिस्थितीत प्रत्येकाने पाणी जमिनीत जिरविण्यासाठी आणि पाण्याचा अत्यंत काटकसरीने वापर करण्यासाठी पुढे आले पाहिजे. प्रत्येक गावात किमान १ हजार जलतारा खड्डे तयार करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहनही जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी यावेळी केले.

सिद्धी शुगरचे कार्यकारी संचालक अविनाश जाधव यांनी जलतारा प्रकल्पाची माहिती दिली.

# बसवकल्याण क्षेत्र समितीची महाराष्ट्र राज्य कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी अ‍ॅड. माधवराव पाटील टाकळीकर यांची सर्वानुमते निवड

**लातूर/प्रतिनिधी:** दि.१७ मे २०२६ येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालय ,लातूर येथे बसवकल्याण क्षेत्र समितीची महाराष्ट्र राज्य कार्यकारिणी गठित करण्यात आली.

जागतिक स्तरावरील नूतन अनुभव मंटपाचा भव्य लोकार्पण सोहळा दि २३ ते २७ डिसेंबर २०२७ दरम्यान बसव भारत उत्सव नावाने पाच दिवस संपन्न होणार आहे. एक लाख शहाण्णव हजार शरण सामूहिक इष्टलिंग पूजा व विविध बौद्धिक सत्र हे कार्यक्रमाचे आकर्षण राहणार आहे. या भव्य कार्यक्रमाचे प्रचार, प्रसार व जनजागृतीसाठी महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र, तेलंगणा, तामिळ, केरळ आदी राज्यांच्या राज्य कार्यकारिणी तयार करण्याचा एक भाग म्हणून आज लातूर येथे महाराष्ट्र राज्य कार्यकारिणी घोषित करण्यात आली. राज्यभरातून १०० ते १५० शरण बंधूभगिनी उपस्थित होते. केंद्रीय समिती सदस्य डॉ.अमरनाथ सोलपूरे यांनी एकमुखी समिती घोषित करून महात्मा बसवन्नांचे विचार, तत्त्वज्ञान ,कार्य हे जगाला जोडणारे असून दलित ,उपेक्षित, वंचित घटकांना एकत्र घेऊन जागतिक पातळीवर प्रजासत्ताक, लोकशाहीवादी व्यवस्थेचे प्रतीक असणारे अनुभव मंटप महात्मा बसवेश्वरांनी बसवकल्याण येथे स्थापन केले. बसवकल्याण जागतिक ऐतिहासिक ,धार्मिक, सांस्कृतिक वैभव वारसा असून हा वारसा संवर्धन करणे, त्याचा विकास करणे आणि वृद्धिंगत करणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. जगभराच्या लोकशाहीचा पाया बसवण्णांनी रचला. दिनांक २३ ते २७ डिसेंबर २०२७ या काळात होणारा बसव भारत उत्सव हा जगाला प्रेरणादायी असा असणार आहे .राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवरील लोकशाहीवादी विचारांचे संत ,लोकप्रतिनिधी, चिंतक, लेखक ,संशोधक, कलावंत या दिव्य अनुभूतीचा लाभ घेणार आहेत,या उत्सवात उत्स्फूर्तपणे सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहनही केले.. किमान पाच लाख लोक उपस्थित राहतील अशा कार्यक्रमाचे नियोजनही भव्य आणि सूक्ष्मपणे असल्याचे डॉ.अमरनाथ सोलपुरे यांनी सांगितले.

अध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळताना माधवराव पाटील टाकळीकर यांनी बसवकल्याण हा भारताचा बहुमूल्य असा सांस्कृतिक वारसा आहे. अनुभव मंटपाच्या रूपाने जगातील पहिली लोकशाही संसद उभी राहिले. कायकवे कैलास ,दया हाच धर्म, देह हेच देवालय, दासोह, ईस्टलिंग पूजा हे बसव तत्त्वज्ञान सकल विश्वाच्या कल्याणाचा मार्ग आहे.महात्मा बसवेश्वरांच्या विचारांनी भारावलेला नवसमाज निर्माण करण्याची नितांत गरज आहे. सर्वांच्या सहकार्याने एक लाख लोक महाराष्ट्रातून येतील असा आशावाद व्यक्त केला. यासाठी जिल्ह्यानिहाय बैठका घेऊन लवकरच जिल्हा कार्यकारिणी तयार करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली.

याचवेळी नूतन अनुभव मंटपाची माहिती देणाऱ्या माहिती पत्रकाचे वाटपही करण्यात आले

महाराष्ट्र क्षेत्र कार्यकारिणी

१.डॉ.अमरनाथ सोलपुरे केंद्रीय सल्लागार,

२.अँड. माधवराव पाटील टाकळीकर, लातूर,अध्यक्ष,

३.विजयकुमार हत्तुरे सोलापूर उपाध्यक्ष,

४. डॉ. शेषराव शेटे नांदेड, सचिव५. प्रा.डॉ. राजेश विभुते, लातूर सहसचिव,

६.सुनिल हेंगणे लातूर कार्यवाह, तर सदस्य

७.रामेश्वर लांडगे छत्रपती संभाजीनगर,

८.शीतल महाजन नांदेड,

९.डॉ. रेणुका संभाहरे गेवराई,

१०.मनोजकुमार रणदिवे कोल्हापूर,

आणि सल्लागारपदी

११.वीरेंद्र मंगलगे,

१२.प्रदीप बुरांडे,

१३.अप्पासाहेब पुजारी,

१४.डॉ. आनंद कर्णे,

१५.उषाताई रोडगे

यांच्यासह अहमदपूरचे नगराध्यक्ष स्वप्निल ह्वत्ते, मा. जि.प सदस्य महेश पाटील, .इंजि राजकुमार कत्ते, प्राचार्य डॉ. सिद्राम डोंगरगे, महेश अंबुलगे, बसवेश्वर हेंगणे,.शेखर हविले,.गुरुनाथ उच्चेकर, विजयकुमार गुत्ते, संग्राम बमणे, रामराव रोडगे, योगेशप्पा स्वामी, लाखे,प्रदीप हलकंचे, दयानंद सावळगी, मेनकुदळे, शरद चौधरी, शिवनगे, मलशेट्टे,मारुती कस्तुरे, विजय शाहीर, उद्धव तवडे, पत्रकार राम रोडगे, बाबूराव माशाळकर, इरण्णा पावले, विरेश कोरे, कोठुळे, बळवंत चिंचोलकर आदी सह कार्यकारिणी घोषित करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुनील हेंगणे यांनी केले.मनोगत शेषराव शेटे यांनी केले तर प्रा.डॉ. राजेश विभुते यांनी केले तर आभार प्रा.डॉ.रत्नाकर बेडगे यांनी मानले.

# प्राचार्य डॉ.रामलिंग मुळे यांना राष्ट्रीय स्तरावरील 'डॉ. पंजाबराव देशमुख ओबीसी रत्न पुरस्कार २०२६' जाहीर



**अजगर मजकुरी/ नळेगाव:** शैक्षणिक, सामाजिक आणि ग्रामीण विकासाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ, कर्तव्यदक्ष लोकप्रतिनिधी आणि समाजसेवक प्राचार्य डॉ. रामलिंग मुळे (जवळगेकर) यांच्या बहुआयामी कार्याची दखल घेऊन राष्ट्रीय स्तरावर त्यांचा गौरव करण्यात येणार आहे. राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघ (महाराष्ट्र राज्य) च्या वतीने प्राचार्य डॉ. रामलिंग मुळे यांना राष्ट्रीय स्तरावरील अत्यंत मानाचा डॉ. पंजाबराव देशमुख ओबीसी रत्न पुरस्कार २०२६ जाहीर करण्यात आला आहे. या निवडीचे अधिकृत पत्र राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाचे प्रदेशाध्यक्ष मा. श्री. अनिल नाचपल्ले आणि राज्य सरचिटणीस मा. श्री. संतोष भोजने यांनी प्राचार्य डॉ. रामलिंग मुळे यांना प्रत्यक्ष सुपूर्द केले असून, त्यांच्या या निवडीबद्दल संपूर्ण लातूर जिल्ह्यातून तसेच राजकीय व शैक्षणिक वर्तुळातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. हा भव्य पुरस्कार सोहळा आगामी शुक्रवार, दिनांक ५ जून २०२६ रोजी पनवेल येथे संपन्न होणार आहे. 'स न्मा न कार्याचा... बळ संघटनेचा...!' या ब्रीदाखाली आयोजित या सोहळ्यात डॉ. मुळे यांना हा गौरव प्रदान केला जाईल. प्राचार्य डॉ. रामलिंग मुळे यांच्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील अतुलनीय योगदानाची दखल यापूर्वीही अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरांवर घेतली गेली आहे. भारतीय टपाल विभागाकडून त्यांच्या नावाने ५०० मूल्याचे विशेष पोस्ट तिकीट जाहीर करण्यात आले आहे. जो एक अत्यंत ऐतिहासिक आणि दुर्मिळ बहुमान मानला जातो. त्यांणा अनेक पुरस्कार मिळाले आहेत. आणि ५ जून रोजी पनवेल येथे होणाऱ्या या राष्ट्रीय पुरस्कार सोहळ्यामुळे त्यांच्या कार्यात आणखी एक मानाचा तुरा रोवला जाणार आहे.

## चौकशी ..

नाचत होत्या स्वप्नात
मेनकारंभा न् उर्वशी
मऊ मऊ छान उशी
बदलत राहिलोकुशी

मोजत असता मजेत
खणाणा सुवर्ण राशी
चालले सगळे चांगले
मधेचं शिंकली माशी

कुणीकेली का काडी
लफडे आले अंगाशी
फुटायं लागले गुपीते
गाठ पडते असंगाशी

सुटण्यासाठी यातूनि
शक्कल काढू खाशी
उच्च स्तरीय एखादी
लावून टाकू चौकशी

विरोधकांना वाटेलं
झाली त्याची सरशी
निघून जातीलं वर्षे
बसत राहीलं बुरशी

आपलाचं आहे कप
आपलीचं आहे बशी
सही सलामत सुटतो
सफळसंपूर्णचौकशी

बदले अचानक सत्ता
कुठून शिंकली माशी
चूकनडेल ती जराशी
रिकाम्या होतील राशी

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# खादी व ग्रामोद्योग मंडळाचा मधुमित्र पुरस्कार लातूरच्या ज्ञानेश्वर मलीले यांना जाहीर

## छत्रपती संभाजीनगर येथे २० मे २०२६ रोजी होणार पुरस्कारांचे वितरण

**लातूर/प्रतिनिधी:** महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या वतीने दिले जाणारे २०२६ सालचे 'मधुमित्र' व 'मधु-सखी' पुरस्कार लातूरचे ज्ञानेश्वर मलीले, छत्रपती संभाजीनगरचे गणेश बुरकुल, बुलढाण्याचे राजेंद्रदास बैरागी आणि पुण्याच्या श्वेता वायाळ यांना जाहिर झाले आहेत. याशिवाय निवड समितीने ठाण्याचे चंद्रकांत तरे, पुण्याचे संजय मारणे, कोल्हापूरचे दयावान पाटील आणि जळगावचे विद्यानंद आहिरे यांची विशेष सन्मानासाठी निवड केली असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे सभापती (राज्यमंत्री दर्जा) रवींद्र साठे यांनी दिली.

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या 'मधाचे गाव' तसेच जागतिक मधमाशी दिनाच्या निमित्ताने योजलेला 'मधु मित्र - मधु सखी पुरस्कार' तसेच मंडळाच्या विविध कार्याविषयीची सभापती साठे यांनी दिली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी लक्ष्मण राऊत, सहमुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र ठाकरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी नित्यानंद पाटील उपस्थित होते.

'मधु मित्र' आणि 'मधु सखी' पुरस्काराचे वितरण २० मे २०२६ या जागतिक मधमाशी दिनी छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित कार्यक्रमात होणार असल्याचे सांगून सभापती साठे म्हणाले की, महाराष्ट्रातील मधमाशीपालन व्यवसायाला चालना देण्यासाठी राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाने २०२३ पासून ही पुरस्कार योजना सुरू केली आहे. या पुरस्कारामध्ये स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र आणि रोख रक्कमेचा समावेश आहे.

राज्यात मधमाशीपालनास प्रोत्साहन देण्यासाठी मंडळाच्या मध संचालनालयामार्फत प्रशिक्षण, जनजागृती मेळावे, मध महोत्सव, 'मधाचे गाव' योजना तसेच मधुमित्र-मधुसखी पुरस्कार असे विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याचे सभापती साठे यांनी सांगितले. 'मधाचे गाव' योजनेसाठी राज्य शासनाने १७ कोटी रुपयांची तरतूद केली असून पहिल्या टप्प्यात दहा जिल्ह्यांतील दहा गावांमध्ये काम सुरू झाले आहे. गेल्या दोन महिन्यांत ३४८ मधपाळांना प्रशिक्षण देण्यात आले असून १७५० मधपेट्या, संरक्षण पोशाख, मध यंत्र आणि अन्य साहित्याचे वितरण करण्यात आले आहे.

या योजनेमुळे निसर्ग संवर्धन, मध उत्पादनवाढ, ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती आणि पर्यटन विकासाला चालना मिळणार असल्याचा विश्वास साठे यांनी व्यक्त केला. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ गेली ६५ वर्षे कार्यरत असून पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य योजना आणि मध केंद्र योजना यांची अंमलबजावणी मंडळामार्फत केली जात असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्वदेशी उत्पादनांच्या वापराचे केलेले आवाहन लक्षात घेऊन मंडळाने हर घर खादी, घर घर खादी ही मोहीम सुरू केली असल्याचेही सभापती साठे यांनी सांगितले.

ग्रामीण भागातील उद्योजकांनी तयार केलेली खादी वस्त्रे, हातकागदापासून बनविलेल्या वस्तू, गणेशमूर्ती तसेच मधापासून तयार होणारी सौंदर्यप्रसाधने नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर खरेदी करावीत, असे आवाहन सभापती साठे यांनी केले.

राज्यात पारंपरिक मध उत्पादनाला चालना देण्यासाठी शासनाने १२ मधगावांना मान्यता दिली असून त्यामध्ये पालघर जिल्ह्यातील घोलवड, नांदेड जिल्ह्यातील भंडारवाडी, नंदुरबार जिल्ह्यातील बोरझर, हिंगोली जिल्ह्यातील काकडदाभा, नाशिक जिल्ह्यातील चाकोरे, अहिल्यानगर जिल्ह्यातील उडदावणे, परभणी जिल्ह्यातील शेलमोहा, वर्धा जिल्ह्यातील सिंधीविहीर, सातारा जिल्ह्यातील सालोशी, अमरावती जिल्ह्यातील आमझरी, धुळे जिल्ह्यातील रामी आणि रत्नागिरी जिल्ह्यातील तळवडे या गावांचा समावेश आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील मध उत्पादकांना बाजारपेठ, प्रशिक्षण व आर्थिक सक्षमीकरणाची संधी उपलब्ध होणार असल्याची माहिती सभापती साठे यांनी यावेळी दिली.

पीएम विश्वकर्मा योजनेअंतर्गत महाराष्ट्रात एकूण २७,५२९ ऑनबोर्डेड ग्रामपंचायतींतील प्रशिक्षणासाठी नोंदणीकृत २,४५,०२६ लाभार्थी असून कर्ज वितरण आर्थिक लाभार्थ्यांची संख्या ५३,५९३ असल्याचे सांगत सभापती साठे यांनी २०२५-२६ या आर्थिक वर्षात मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत राज्यात ५,७९१ प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली असल्याची माहिती दिली. यासाठी ९७२३.१८ लाख रूपयांचे मार्जिन मनी मंजूर करण्यात आले. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत १,०७८ प्रकल्पांसाठी २०२१.९८ लाख रूपयांचे मार्जिन मनी वितरित करण्यात आले असून या माध्यमातून ८,६२४ रोजगार निर्मिती झाली आहे. त्याचप्रमाणे प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेंतर्गत महाराष्ट्रात १,६२५ प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली असून ५९४७.५लाख रुपयांचे मार्जिन मनी वितरित करण्यात आले असल्याचे सभापती साठे यांनी सांगितले.


रोज वाचा ऑनलाईन
लातूर समाचार
www.latursamachar.com



**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGE MY NAME FROM SARWADE DATTRAYA TO SARVADE DATTRAYA GOVINDRAO HENCE FROTH THIS DECLERATION AND WILL BE KNOWN BY THIS NAME I WILL USE SARVADE DATTRAYA GOVINDRAO IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY CHILDREN AND FAMILY.
**OLD NAME:** SARWADE DATTRAYA
**NEW NAME:** SARVADE DATTRAYA GOVINDRAO
**ADDRESS:** C/O SARVADE GOVINDRAO,SHIVAJI NAGAR TQ NILANGA,DIST-LATUR (M.S.)413521



निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396



Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६